# कादोडी

नाताळ २५ डिसेंबर २०२५

चौदावा वहरी एकून २१ वॉ अंक ( खाजगी वितरण)



Design : Paul Dmello


BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD
(SCHEDULED BANK)
"Celebrate the Joy of Giving with
Bassien Catholic Co-operative Bank
this Christmas Season!
Invest in moments that matter and
gift a prosperous future to your loved ones.
Merry Christmas
And Happy New Year
filled with financial security, growth, and joy!"
Board of Directors
Mr. Benauld Dias
Chairman
Mr. Simon Soares
Vice Chairman
www.bccb.co.in
Helpline no. 080 6942 0000
Corporate Add. - Catholic Bank Building, Papdy naka, Vasai west 401 207
For more details visit our

# कादोडी

## नाताळश्या हनाऑ विशेषांक

२५ डिसेंबर २०२५

चौदावा वहरी
एकविसावॉ अंक

खाजगी वितरन

### या अंकात .......

संपादकीय
कॉपातशा कॉपात – सायमन मार्टिन
बंदवा ! माला माफ कर... – क्लेमेंट डिमेलो
मॉराऑ लाडू – फ्रान्सिस डिमेलो
सादु आन आपुन दोगे – सिरील मिनेझीस
नॉस्टॅल्जिया....! – संगीता वाझ.
माळयश्या बंदोरनॅ - ईनास तुस्कानो
हाकर जाले हाकर – जोसेफ डाबरे
आपल्यो कुपारी परंपरा – पायस आलेस तुस्कान
लाल लुगड्याई हाईल – फ्रँक मिरांडा
युटुपवर दिलॅ आन वाट्स अपवर... - ऑल्विन परेरा
देवळाशी हप्पथ - सुजाता तुस्कानो
बाहांलॉ – विजु वाझ

**संपर्क / अभिप्राय :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान नातॅ आपला या अंकाविषयीसा मत, संपादक मंडळाश्या कुनालाही भॅटॉन जरूर कळवा.

**संपादक**
ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८)

**सहसंपादक**
एडवर्ड डिसोजा

**संपादक मंडळ**
सुनील बा. डिमेलो, सायमन रॉड्रिग्ज, तेरेजा डिसोजा, जेम्सन डिमेलो, डॅनियल मस्करणीस, रॉबर्ट फर्नांडिस, राजन डिमेलो, रॉबिन्सन डिमेलो, वॉल्टर तुस्कानो, सिरील मिनेझीस

**मुखपृष्ठ :-** पॉल डिमेलो, गास

Email :- kadodivasai@gmail.com

**Web :- www.kadodi.in**

या अंकात प्रसिद्ध जालॅल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदॅस आहा नाय.

जकलॅ जाहिरातदार, देनगीदार तहॅस बरा-वाईट मत देनाऱ्या जकल्या कुपारी लॉकांअॅ आमॅ खूप आभार मानत्याव.
**नाताळसॉ हन सब्बान कुपाऱ्यांना खुब आनंदाव आन मजॅऑ जाओ अह्यो शुभेच्छा.**

**सूचना:-** ‘कादोडी’ या अंकात तुमाला लेख, कविता आहा कय द्यासा हायदॅ तॅ **kadodivasai@gmail.com** याओरती धाडा नातॅ संपादक मंडळाला भेटा.

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित), वाघोली.

रजि.नं.टीएनए /व्हीएस्आय /आरएस्आर / सीआर / ४२९ / ८८-८९ दिनांक ९-१२-१९८८

## *कोकण विभागातील अग्रेसर पतपेढी*

**आपल्या व्यावसायीक व कौटुंबिक विकास योजनेसाठी पतपेढीच्या सेवा**

*१३ महिन्यापेक्षा जास्त ते १८ महिन्यापर्यंत*

**जीवन विकास दिर्घ मुदत ठेव योजना** ७.५० % (सरळव्याज)

ज्येष्ठ नागरीकांच्या ठेवीवर - **द.सा.द.शे. ७.३०%** व्याजदर

सर्वसाधारण सभासदांस द.सा.द.शे. ७.०५ % व्याजदर

**८.५०% ते ११.७५%** व्याजदराच्या विविध सुलभ कर्ज योजना.

**शैक्षणिक कर्ज किफायतशीर व्याजदरात - ८.९५%**

**वैयक्तिक तारण कर्ज - ९.७५%, दागिना कर्ज -८.७५**

**घरबांधणी कर्ज - ८.५०%, फ्लॅट खरेदी कर्ज - ८.५०%**

**सोलार पॅनल कर्ज - ८.५०%, व्यापारी वाहनासाठी - १०%**

**शॉप, गाळे, मशिनरी कर्ज - ९%, फर्निचर -९%**

**(१ कोटीपर्यंत कर्ज वितरण करणारी एकमेव पतसंस्था)**

**रू. ५ लक्ष पतकर्जाचे त्वरीत वितरण**

नियमित कर्ज भरणा करणा-यांना व्याजात २% रिबेट

### ३० नोव्हेंबर २०२५ अखेर आर्थिक प्रगतीचे बोलके आकडे

* भागभांडवल रू. १४.४७ कोटी
* कर्जे रू. २३८.६० कोटी
* ठेवी रू. ४२५.६७ कोटी
* गुंतवणूक रू. २८१.७४ कोटी
* एकूण व्यवसाय रू. ६६४.२७ कोटी
* सभासद संख्या १७९५४
* निव्वळ एन. पी. ए. ०%
* दि. ३१/०३/२०२५ अखेर नफा रू. ६.४२ कोटी

☞ आजच जवळच्या शाखेत भेट द्या

**सेवामयी शाखा -**

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट | आगाशी | नालासोपारा (प.) | नंदाखाल |
|---|---|---|---|---|---|---|
| मो.८००७९५५४३० | ७२६१९१९०१२ | ०८५५०९१०२६४ | ७२६१९१९०१३ | ०८५५०९१०६४३ | ७८७५८९५५०८ | ८४४६४०७७०५ |

लता जे.फोस
मुख्य कार्यकारी अधिकारी

संज्याव जे.रोझारियो
उपाध्यक्ष

नेल्सन पी. दोडती
अध्यक्ष

व संचालक मंडळ

# संपादकीय

सब्बान कुपारी बाहा-बेनींना नाताळश्या हनायो आन नव्या वहरायो ओबड्यो शुभेच्छा.

मंडळी, आमशी ‘कुपारी कट्टा’ टिम कून भोटे माहने नात पन “कादोडी” अंक यो आपल्या कुपारी समाजाआ मुखपत्र हाय आहा आमाला वाटातॅ भगून लान्या तॉंडा भॉटॉ मॉडकॉ घॅत्याव पन आपल्या समाजात जा का सल्लॅ त्योर बोयला पाय. आमॅ नेहमी एकुस विसार करत्याव की जहा बरा सल्लॅ त्याला आपून जहा तुकॉन धरत्याव ताहा जा चुकीआ सल्लॅ त्याओर पन बोयला पाय.

मंडळी, आपल्या अडॅ कईक मयन्या अगोदर तरुन पॉराई जीव दिलॉ, तॅ कैक जनाई घारा न हांगता पळॉन लगीन केला. आज आपले पोरे शिक्षान, नोकरी आन देशात जा सल्लॅ त्याबनॅ टेन्शन मिनॅ हात, पन त्यास वॅळॅला त्याई ऑडा लक्षात ठव्या पाय की २०-२२ वहरे तुमश्या आयबापाई तुमाला तुमश्यो जकल्यो इच्छा पुऱ्यो करॉन वाडविला, चांगला शिक्षान दिला, चांगलॅ संस्कार दिलॅ तॅ तुमॅ अहे पटकान भाऑ (विहरॉ) नाका.

तरुन मंडळींला आवाहन कऱ्यासा हाय गा, तुमॅ तुमशॅ प्रॉब्लेम तुमश्या ममी-पप्पाला हांगा, त्याहरी बॉला, मंग ता प्रेम अहो गा बी कय गोष्टी. मम्मी-डॅडी सुरूवातीला विरोद करद्यात पण ते तुमश्या भल्याऑस विसार करनार. तहेस तुमश्या मित्र-मैत्रिनीबरबर तुमॅ शेयरिंग करू शकात्या. कून तरी तुमाला चांगला हांगॅटॅस पान एकदम टॉकाआ पाऊल घॅऑ नाका. ताहास आय-बापाई पोरांना समजॉन घ्या पाय, माला वाटातॅ तास मा पॉरानॅ / पोरीनॅ कऱ्या पाय आहा बंदान नाका, आपून पन त्यांना समजॉन घ्या पाय.

बी मंजॅ अह्यो घटना घडल्यो गा आपल्या मिनसॉ डिटेक्टिव्ह नातॅ पत्रकार जागॉ हॉवातॅ. मंग बऱ्यापैकी त्या प्रकरनोर काथ्याकूट कॅला जातॅ. एकाये दोन करॉन कितीतरी प्रकारश्यो अफवा पसरविल्यो जात्यात. त्या घरश्या लोकाई का परिस्थिती जाले हायदॅ त्याआ आपल्याला भान नाहातॅ. अह्या वॅळॅला मदत कऱ्याशी तॅ हॉडॉन द्या पण त्याआ घारा जाऑन नाय ती बडबाड कदो कऱ्याशी.

मंडळी, अजून एक बात हाय, आमॅ गॅल्या वहरा पन हांगिलता आन यंदा परत हांगात्याव, आपुन लग्नाआ कार्यक्रमाओर ध्यान द्या पाय आहा आमाला वाटातॅ, गुरवारपासून लागला तॅ पुडश्या आठवड्याआ मंगळवारपोत आपलॉ कार्यक्रम सुरू आहातॅ. नक्की ऑड्या सेलिब्रेशनशी

गरज हाय गा. या कार्यक्रमात हॉनारी सयपाकाइ नासाडी, प्री-वेडिंग रिसप्शनमुळॅ सुकनारॉ अंदाज, त्यामुळॅ हॉनारॉ पैशाऑ नास. यावर आपुन जरा कडाक नंदार टाक्या पाय.

मंडळी, आतॅ आनंदायो बातम्यो. भुईगाव, सामनी आळीशी कॅरोल लिनस डाबरे यीला १२८ देशाश्या १७६० सॉफ्टवेअर इंजिनियर मीननॅ इंटरनॅशनल इंजिनियरिंग लिडरसॉ मान मिळॉन गोल्ड मेडल मिळालॅ, आपल्या समाजाऑ यॉ अभिमान हाय. तिआ अभिनंदन. शिरलयवाडीसॉ पॉर, इयान लोपीस यानॅ गेल्या मयन्यात झांबिया इंटरनॅशनल बॅडमिंटन स्पर्धेमिनॅ डबल्सशी स्पर्धा जिकिली आन या मयन्यात खेलो इंडिया स्पर्धेमिनॅ सिल्वर मेडल जिकिला, त्याआ अभिनंदन.

आपले पोरे अभ्यासा बरबर कला-क्रीडा या प्रकारात पन बऱ्यापैकी चमक्या लागल्यात त्यांना पुडॅ जादो खुब खुब शुभेच्छा. त्यासबरबर आपल्या समाजासॉ नावाजलॅलॉ कवी-लेखक सायमन मार्टिन यांना जानेवारी मयन्यात नाशिकला हॉनाऱ्या २७व्या मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाआ अध्यक्षपद मिळालॅ, त्यांसा अभिनंदन आन संमेलनाकरता शुभेच्छा.

मंडळी, आपलॉ ‘कादोडी’ अंक छापील आन ऑनलाइन अहॉ दोन्ही प्रकारॅ प्रकाशित हॉतॅ, छापील प्रती ज्यांना पात त्याई आमश्या संपादक मंडळाला कॉन्टॅक्ट करा. आमॅ पॉशव्याशी व्यवस्था करत्याव.

कादोडी अंकातनॅ आपली भाशा जगवॅकरता प्रयत्न करतॅवुस पन दरवहरा आपल्या समाजाआ भल्याकरता एक बरॉ विसार पन देत्याव. एक कुपारी समाज भगून आपुन जकले सोबत रॅवॉन पुडॅ जाऑ. बाकी आपल्या समाजायी अहीस चांगली प्रगती हॉत रेवो आन आपली संस्कृती टिकॉन रेवो...

वसईचा सुपुत्र संत गोन्सालो गार्सियाच्या नावाने स्थापन झालेली

# गार्सियन नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित गास

गेली पंचवीस वर्ष गावातील गोरगरिबांची पत निर्माण करून अर्थसाहाय्याबरोबर
सामाजिक बांधिलकी जोपासणारी पतसंस्था
आपल्या व्यावसायिक कौटुंबिक विकासासाठी पतसंस्थेच्या पुढील योजना

## ठेवी वरील व्याज दर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 30 दिवस ते 180 दिवस | 4.50% | सुलभ ठेव | 4.50% | बचत ठेव | 4.00% |
| 181 दिवस ते 365 दिवस | 5.00% | दैनंदिन ठेव | 4.00% | | |
| 13 महिने ते 18 महिने | 7.50% | 19 महिने ते पुढे | 7.00% | | |

## कर्जा वरील व्याजदर

| | | | |
|---|---|---|---|
| जामिनकी कर्ज सर्व रक्कमेस | 11.50% | तारणी कर्ज सर्व रक्कमेस | 09.50% |
| सोने तारण कर्ज | 08.50% | गृह कर्ज | 08.50% |

**मोबाईल : 9730153616**

**सर्व प्रकारच्या कर्जावर सरळव्याज पद्धतीने व्याज आकारणी, प्रोसेसिंग फी नाही**

**मेरी परेरा**
मुख्य कार्यकारी

**एडविन डिमॉन्टी**
अधिकारी उपाध्यक्ष

**निकोदेम आल्फान्सो**
अध्यक्ष

# एकता सहकारी पतपेढी (म)

## शिरलय - आगाशी

रजि.क्र. टीएनए/(व्हिएसआय)/आरएसआर (सीआर)/११७३/१९९९-२०००

# नविन आकर्षक ठेव योजना

**१८० दिवसांसाठी ८% व ८.२५%**
(ज्येष्ठ नागरिक)
३१ डिसेंबर २०२५ पर्यंत



**कर्ज प्रति १० ग्रॅम वर ₹ ८००००/-**

-: आपले विनित :-

श्री. फ्रान्सिस लोपीस
(अध्यक्ष)

श्री. आल्बर्ट डिसिल्वा
(उपाध्यक्ष)

श्री. सुनिल डाबरे
(सचिव)

श्री. संदेश गोंधळेकर
(महाव्यवस्थापक)

सौ. रेक्सीना लोपीस
उपमहाव्यवस्थापिका

सर्व संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग व सभासद

Mob No.: 7972884924 / 9130062511 / 9130074815

# कॉपातशा कॉपात – सायमन मार्टिन, भुईगाव

हांशॅ स वाजलोतॅ. मॅ माआ घरात कॅयतरी कागाद बगीत भॅहॅलतॉ. ऑड्यात बॉठ्ठन बॉंब मारल्यागत कॉपात अही हाक कानोर आली. ती हाक आयकॉन लॅकांना वाटलॅस हायदॅ माआ कय कमीजास्ती जाला गा का..?

मॅ ओट्योर ॲऑन बगीतॅ तॅ माऑ कॉपात दारा ऊबी हाय. मॅ तॅला बोयलॉ पन, ‘कॉपात तुमशी हाक आयकॉन लॅाँका पॉटात फाळ पडॅसॉ आन तॅंना वाटलॅ हायदॅ गा मा कय बरा वाईट जाला भगून.’ योर कॉपात हांगातॅ, ‘ताहा नाय ना, पन शार दी जालॅ तुमे दिखले ना, आपली भॅट नाय जाली तॅ माला तुई खित आली.

इ बाकी तॅनॅ खरा हांगीला हां. रॅज माआ घारा फेरी मारनारॉ कॉपात. गॅलॅ शार पास दी आमी भॅटलॅ नॉतॅ. मॅ माआ ॲका कामात अड्कालतॉ तॅआपायान माला वखत नाय मिळालॉ. आतॅ पनशात्तरि जाली, कय गोश्टी कामायो हात त्यो आटपील्यो पात. खरा हांगॅसा तॅ उजाडलॉ दी मॉजॅसॉ नाय पन अस्ते अस्ते जकलॅतनॅ हळुस बार पडॅसा. पन अहॉ एकदम पाय काडना कय सॉप्पा नाय. आडॅ रॅआसॉ कॉडॉ पन कंटाळॉ आलॉ नातॅ कॉडॉ तरास जालॉ तरी पन अडसा प्रेम कय हूटॅ नाय.

काल हाकोटे देवळातनॅ येताना ऑस विसार करतोतॉ. जा आयुश्य मिळालॅ तॅय आबार मानॅशॅ. बीयांपेक्षा माला वदारुस मिळालॅ आन तॅत मॅ सुखी हाय आहा मानला गा आलॉ दी आन पुडसा आयूश्य बरा जायदॅ. डॉखॅत विसारांऑ नांगर फिरवीत फिरवीत आमी ओट्योर येऑन बैठक मारली. कॉपात तॅआ नेहमीश्या हव्वइ परमान हिंदाळॅत बॅहलॉ. बिडीऑ एक झॉकॉ घॅसॉ तहॉ एक बारीकसॉ झॉकॉ घॅटलॉ. पाय मातीओर टेकवीलॅ अन माआओर वॅळभर डॉकायलॉ. तॅआ मनातसा कयतरी तॅला हांगॅसा हाय याव माला अंदाज आलॉ. मनातश्या मनात तॉ विसार जुळवितोतॉ.

आमश्यो गोश्टी सुरू जाल्यो. मॅ पुडश्या बाकोर बॅहलॉ. हांशॅ स वाजॉन गॅलतॅ. नोवेंबरसॉ थंडीऑ मयनॉ, भगून काळोख पड्या सुरवात जालती. मॅ उठलॉ अन ओट्योरशी लाइट सुरू केली. आख्ख्या ओट्योर जहॉ उजेड जालॉ तॅनॅ आमश्या तोंडोर तॅज पसारला. उजेड हॉता खोटी कॉपातनॅ कापाळोर खुरुसाई खुन काडली.

मॅ तॅला बोयलॉ, ‘कॉपात बॉला! काहां का सल्लॅ?

मॅस बोल्या सुरवात केली. आज तँव मूड कय बरॉ दिखात नॉतॉ. तॉंड उतारलोता. तॉ तॅआस विसारात घालवालतॉ.

'का सलॅसा कॉपात, सलॅदो गाडीत पेट्रोल भऱ्या लागातॅ आन ता भऱ्या माऑ खीसॉ फाटलॅ.' माओर डॉकाइत तॉ बोयलॉ. 'तुमे हुशार निंगालॅ, मास्तर जालॅ. मॅ सौदा वहराव असतानास मुंबयश्या रस्त्या लागलॉ.'

मॅ हांगीला, 'कॉपात! तुमी अऱ्द्यात शाळा होडली नसती तॅ मास्तर का अजून बॉठ्ठॉ सायेब जालोसॉ.' त्योर कॉपात बोयलॉ, 'तुआ तॅ गाइ हायुस सातवीत असताना माऑ बाबा मॅलॉ. आमी शार भावंडे. मॅ जकलॅत बॉठॉ. मॅ तेरावा वहरी हॉडॉन चौदाव्यात खीरलॉतॉ. माइ बय कैक दी आतमीनॅस बेहली. शारपास दी मॅरदॅरशे आले. पै-पावनॅतशे आले, पन नंतर घर हालाटी पडला. बारके भावंडे बयश्या तोंडोर डॉकॅशे आन बय माआ तोंडोर. कुनाव आदार नॉतॉ तॅ पुडॅ का आन काहा करॅसा ताआ हुमजात नॉता.

नंदऱ्यापुडॅ नुस्तॉ काळोक अन तॅत भरोशाव माहनू दिखात नॉता. अह्या वक्ताला आमसॉ अंतोनकाका मदतीला आलॉ. तॉ बाबा बरबर मुंबय जासॉ भाजीपालॉ घॅऑन. बाबानॅस तॅला मुंबयसॉ रस्तॉ दावडलॉतॉ. कय बरे गीराक बांदॉन दिलते. तॅआ बरा सल्लॉता. तॅआ पुडॅ विशय निंगालॉ अन एक दी तॉ माला बाबा जॅआ जाग्योर भाजी वीकॅसॉ तडे घॅऑन गॅलॉ.

तॅआ दुहऱ्या दिहापासून माआ खांदयोर कावड आली. मॅ मुंबयशी वाट धरली भगून माआ कुटूमाआ निभावला. मायो दोन लान्यो बेनी शाळा हिकल्यो. बाहासा शिक्षान जाला. माआ मुंबयश्या कावडी मुंडोर दॉगा बेन्याये लग्ने लाविले. बाहा नोकरी लागलॉ. तॅनॅ तॅआ लग्ना बगीला. मंग तॅनॅ वायला घर बांदीला अन मॅ तॅआस जुन्या घरात रॅलॉ. या जकल्या हारकाहूरका केल्योर मॅ लगीन कॅला.

कॉपात! तुला हांगातॅ, कून कूनाआ नाय." त्योर मॅ तॅला बोयलॉ, 'आहा नाराज हॉऑन नाय सलॅसा कॉपात. तूआ का वाईट जालॅ हांगू? हॉन्याहारकॉ तुऑ पॉर. तॅला तुआ कश्टाइ जानीव हाय. बरी नोकरी हाय तॅला. घररु तॅनॅ नवा बांदीलॅ. बऱ्या घरश्या पोरीहरी लगीनू जालॅ, तुयो दोनू पोऱ्यो पन बऱ्या घारा गेल्यो.

तॅ कॉपात माला हांगातॅ, 'हां, जकला बरा हाय. पन लुजान, तुई कुमारी तीनॅ ऑड्या लवकर जा पा नॉता. समुद्रा अरद्यात मा हॉड्का तुटला आन मॅ ॲकटॉ पडलॉ. घरात कून बॉल्या नाय गा साल्या नाय. जॉ तॉ आपल्या व्यापात. आपल्या जगात. आख्खा आयुश्य कावड खांदयोर घेटली आतॅ जरा विहांबॉ मिळालतॉ तव इ माला हॉडॉन गेली. कॉपात तुला आठोन हायदॅ, आपल्या

गावात परेरा फादर हॉतॅ आन तिगाळा मॅ रॉज देवळा जासॉ. माआ घरशी परिस्तिती गरीब भगून कय दी मॅ दॅवळा फादर दरी बारीकसारीक कामे करॉन तडेस वस्ती रॅसॉ. माइ हुशारी बगॉन फादरनॅ माला हांगीलता, 'कैतान, तुआ शिक्षान जाला गा तु फादर हॉया जाय. मॅ पन तिगाळा फादर हॉयासॉ सपान बगीतोतॉ.

पन माइ शाळा हुट्लिस गा आन माइ पाटीइ फुटली. पातेराती उठॅसा, मुंबय जासा. यातुस माइ जवानी गेली. बेनी बाहा शिक्षान, तॅए लग्ने, बयसा आजारपन या जकल्या व्यापाआ तिगाळा माला कय वाटला नाय. सॉताऑ विसार कऱ्या वखत हॉतॉ कुनापा? जकल्या व्यापात मॅ माये सपने बाहॉनुस गॅलॉ.

इ हांगताना कैतान कॉपातला आवट आलॉ. माला तॅआ डॉळॅत बगॅशी हिम्मत जाली नाय. मॅ तॅला हांगीला, 'का आहातॅ ना कॉपात, आपुन जन्मा येतॅव तिगाळास आपला नशीब लिवीलॅला आहातॅ. आपलॉ रस्तॉ आदीस आखीलॅलॉ आहातॅ आन जा घडॉन गॅलॅ तॅआ आतॅ दुख करॉन का करॅसा.? कुटूमाइ जबाबदारी आंगोर आली ती तु नीबविली. तॅय आशीर्वाद तुला मिळालॅ. योर कॉपातनॅ आदीसास रडगाना सुरू कॅला.

'जकला खरा. मॅ खुब सोशीला. लगीन जाला पोरे जाले पन लुजान अही अरद्यात माला हॉडॉन गेली. ती गेली आन माइ मनातशी बाग हुकॉन गेली. ताहा माआ बरा सल्लॅ. ऑबाय बरी मिळाले. सॉता बाबा कॅला नाय ऑडा मादो करतॅ. पॉरांना खादो द्याश्या आदी पयला माआ करता टेबलोर ठवॉन देतॅ. कतॅ कतॅ आहा वाटातॅ गा जनमभर काम कॅलॅआ फळ माला ऑबायश्या रुपानॅ मिळाला. ती जॅ बरी नसती तॅ माइ का हालत जालोस्ती.?

तुला पेन्शन मिळातॅ तॅ तुला टेन्शन नाय. माआ खिशात आतॅ दिडकी पन नाय. मॅ पुरॉ पोरोर हाय. ऑबायू नोकरी करतॅ. घर आन नातोंडे मॅ हांबाळतॅ. बीये बारीक सारीक कामे करतॅ. पॉर ऑबाय कय भगून कमी पडॉन देत नाय. तॅतॅन हांगातॅ कॉपात, कतॅ टिमकॉभर नवटाक-पावशर मारली गा मुक्काळॅ आपल्या घरात बॅहॅसा. बॉठ्ठॅन बॉलॅसा नाय कारन घरात पॉरायो दोन पोऱ्यो हात. तॅना अब्ब्यास हाय. तॅन्ना आहा वाटॅ नाका गा आपलॉ बोठ्ठॉ बाबा हिकलॅलॉ नाय. तॉ घरात नुसतीस बडबड करीत आहातॅ.'

ताहा नाय कॉपात.! मॅ पन कतॅतरी नवटाक घॅतॅ पन रॉज शार वाजता उठातॅ. उठ्ल्योर देवळा जातॅ. ताहा मा बरा सल्लॅ. लुजान गेल्योर ऑबायनॅ माला हांबाळला.' त्योर मॅ बोयलॉ, 'कॉपात, देव जिगाळा एक दार बन करतॅ तिगाळा शार उगडतॅ. आतॅ तुआस बग गनी. तुई ऑबाय

मॅल्या बापाई पोरी. घरशी गरीबी पन तुमश्या घारा आली आन तुला जकला तुआ पोरीगत करतॅ'. माला आतॅ आहा वाटातॅ गा दॅवानॅ माला दोन

पॉर दिलॅ तॅत एक पोरी द्या पावती. तुला भगून हांगातॅ, 'मॅ आतॅ बॉठ्ठ्या दरी हाय. आमश्या दॉगाय खोल्यो वायल्यो. संयपाक तन एक आहातॅ. माला शाळीस हजारावर पेन्शन हाय. आख्खॉ बझार मॅ करतॅ. बारीकसारीक खर्स मॅस बगीतॅ. पन माइ बोठ्ठी ऑबाय मागश्या मयन्यात कुनाला तरी हांगातोती ता मॅ आयकीला, 'एक हारकॅ बयबाबा आमश्या दरी कदो.? तँॅऑ राजारानीऑ संवसार आन ये अडसन आमे हांबळॅशी.?

आतॅ पॉरां मनात आमशी वाटनी करॅसॉ बेत सल्लॅ. एक मयनॉ बॉठ्ठ्या घारा तॅ एक मयनॉ लान्या घारा. ताहा बगीला तॅ माइ इस संयपाक करतॅ आन ऑबाय आमाला अडसन हांगातॅ. बरा हाय गा अजून आमे सलते फिरते हाव. उद्या खाट्यात पडले तॅ ये आमशी खाट टुकॉन ओट्योर ठवीदॅत. भगून मॅ हांगातॅ, आपुन जास्ती बॉठ्ठन आवाज करॅसॉ नाय. आपलॅ दि आतॅ भरलॅ. आपल्या दरी पैसॉ हायदॅ तरी तॅला अर्थ नाय कारन आपुन तँॅआ मर्जीओर जगातॅव. बॉलता बॉलता आठ कतॅ वाजलॅ ता कळलास नाय.

कॉपात बोयलॉ, 'कॉपात आतॅ थंडी सालू जाली. तॅआ बॉलनॅऑ रुख मॅ हुमजालॉ मंग आमी आमश्या खोलीत गॅलॅ. दोन गलाशे काडले. पुडॅ टेबल ठविला. गलासात टाकीलॅलॉ लाल रंग आवडीनॅ बगीलॉ. कॉपातनॅ गलास टुकीला एक थेम मातीओर टाकीलॉ. माला आहा वाटला गा तॅनॅ कुमारीइ आठोन काडली. अजून कय अडश्योतडश्यो वार्ता जाल्यो. मंग पावलाऑ आवाज न करता कॉपात तॅआ घारा गॅलॉ.

मॅ माआ खोलीतसा जकला हामटीला ऑडॅत पराथनेऑ आवाज माआ कानोर आलॉ. बॉलनॅआ नादात ऑडॉ पन उहुर जालॉ नॉतॉ गा बायकूला माइ वाट बगीत थांब्या लागला. पयला रहस्य आतॅ कडॅ सुरू जाल्ता बास. नंतर कॉडॉ वखत गॅलॉ कुना गाइ पन माआ कानोर शब्द पडलॅ, "बागेत प्रभूला रक्ताचा घाम आला..."

## बंदवा ! माला माफ कर...!! – क्लेमेंट डिमेलो, वटार नंदाखाल

आब तुंबलॅलॉ.. कुनॅ टासन लाविली तॅ टस्कन फुटॅदॅ, अहॉ बार पान्यानॅ कॅलतॉ. दी नुसतॉ रडातोतॉ.

सांतानशी घटका घायलती दॉपारपासून लोक तीआ घारा वाया लाग्लोता. आतॅ जीव जायदॅ, खामॉन जायदॅ.. पन सांतानसॉ जीव कय जाता जात नॉतॉ. गॅलॅ स मयनॅ ती खाटयात ओथी.. तीऑ पॉर, तीयो ऑबायो तीआ जकला जकला करतोते. तिला कय कमी पडॉन देत नोते. पन तीआ तब्येतीत कय सुदारना जाळी नाय. वीज पडलॅलॉ माड जहॅाँ झडॉन-खडॉन जातॅ, तही सांतान झडॉन-खडॉन गेलती. गॅलॉ एक मयनॉ नुसती कनेरीओर ओथी.

सांतानशी लानी बेन – कोशी तीआ मॅरॅ बेहल्ती, “बाय! तुऑ जीव कडॅ अडकालॅ?.. कॅआ बल्नि तुऑ जीव जाय नाय..?” सांतानसॉ आथ आथात घॅऑन कोशीनॅ बडबाड लाविलती... बादामाखालशी डोकरी उजा पन आल्ती. तीनॅ भावरथ बॉलॅदो सुरवात केलती. ता बॉलॉन जाला.. पन सांतानशा डॉळॅतनॅ नुसतॉ पानी वाआतोतॉ.. ती वर डॉकातोती.. आहा वाटातोता तीइ नंदार कुनाला तरी शोदीतॅ... ती कुनाईतरी वाट बगीतॅ.. कुनॅतरी हांगीला, ‘सांतानशी खाट बालाखाला घ्या’ तही जकलॅइ सांतानशी खाट बालाखाला हाडली... पन सांतानसॉ जीव कय तीइ कुडी हॉडॉन जादो तयार नॉतॉ.

सांतानशा बेंनीला कोशीला माइत हॉता, सांतानसॉ जीव कडॅ अडकालॅ? तिलास कादो? तीआ हॉकऱ्यांना आन तडे जमलॅल्या जकलॅंना इ माइत हॉता. तीऑ जीव तीआ पाठशा बाहामीनॅ अडकालॅ.. तीऑ बाहा, तॉमा... तॉमाइ ती वाट बगीतोती. कोशीनॅ अंतोनला हाक मारली. अंतोन डॉळॅ पुहीत पुहीत कोशीमॅरॅ आलॉ. ‘आयकात्या.. मॅ का हांगातॅ, तुमे अहेस जा, आन तॉमाला बॉलवॉन हाडा.’ अंतोन बोयलॉ, ‘मॅ नाय जासॉ, तॉ कुना आयकॅ नाय.’ कोशी बोयली, ‘त्योर नाका बगॉ.. मा बेंनीओर बग. तीऑ जीव अहॉस टांगलॉ रेउंदे आहा वाटातॅ गा तुमाला.?’ तहॉ अंतोन उठलॉ अन तुमानीला हात पुहीत पुहीत तॉमाला बॉलव्यादो जा निंगालॉ..

अंतोन हॅता बांदोरनॅ निंगालतॉ. तॉमाला का हांग्यासा याऑ तॉ विसार करतोतॉ.. तॅला कुहन्या भाशात समजाव्यासा.. तॉमा पुडॅ अंतोनसा कय सलात नॉता. तॉमा शार बुके हीकलॅलॉ. तॅआ मुंडोर तॅला सचिवालयात बरी नोकरी लाग्लोती. अंतोनशी परिस्तिती गरीब. अंतोनसा कोशीहरी हयरा जालता, तिगाळा तॅला हनावराला बॉलवॉन हाडॅशे. पन तिगाळा पन तॉमा अंतोनश्या हरी जॉड्यास तॉडा बॉलॅसॉ.

अंतोनला जकला कळातोता. तॉमा नोकरीला जातोतॉ. अंतोन भाटात खपातोतॉ. नौटाक पावशेर मारॅसॉ! तॅआ बल्नि तॅइ किंमत कमी. पन अंतोन तॉमाऑ राग करीत नॉतॉ, कारन अड्ल्यानड्ल्याला तॅला तॉमाऑस आदार!

अंतोनशी बॉठ्ठ्या हाळीओर सांतानाओर बोठी माया. सांतानशी गोष्टस वायली. ती उटीसा मुठीत घालॅशी. आन कोशीआ सौसाराला आथबार लाव्याशी. सांतानसॉ सलतॉ वखत जालतॉ, भगून ती कोशीला बगीतोती. उटीमीनॅ खान्याई पिडी हाडॅशी. भाटात कोशी काकडॉ खुडतॅ हायदॅ, तॅ सांतान उटीशी वस्तु तीआ मुठीत घालॅशी. कतॅ कंबऱ्याला बांदलॅल्या सशीआ तॉंड मॉकळा करॅशी, आन दोन-पास रुपय तीआ आथात टॅकॅशी.

अंतोन सलता सलता तॉस विसार करतोतॉ, ओडी सॉबावानॅ बरी अहलेली माई बोठी हाळी सांतान.. तीऑ तीआ भावंडामीनॅ ऑडॉ जीव. मंग तीआ तॉमा बाबतीत सुकला तरी का?

तीनॅ तीआ बॉठ्ठ्या पोरीआ लग्नाला तॉमा दरनॅ हॉना मांगीला, तॉमा हांगातॅ, 'मॅ एकुस तॉळॅा देनॅ..' पन सांतान 'तीन तॉळॅ दे' भगून अठ्ठाला पेट्लोती.. शेवटी तॉमानॅ तिला दोन तॉळॅ हॉना दिला पन तीआ बरबर बॉलना-साल्ना टाकीला. तॉ तीआ पोरी लग्ना पन आलॉ नाय. आपलॅत हांगातॅत, "लगीन वेळ आन तॉरान वेळ माहनानॅ  सुकव्याशी नाय". पन तॉमानॅ ती सुकविली. जाला. रक्ताआ नाता तुटला. आजपेरेंत हॉन्या हांगडे नाते, हॉन्या पायानुस तूटल्यात. विसार करीत करीत अंतोन हारोडी पॉसलॉ.

तॉमाआ ओट्योरसॉ दरवाजॉ बन हॉतॉ. अंतोननॅ दार आथाय लोटीलॉ. तॉमा आतमीनॅ आराम खुरशीओर बॅहॅलतॉ.. पन तॅनॅ खुरशीला पाठ टेकील नोती. अंतोन तॅआ मॅरशा बाकोर जाऑन बॅहलॉ.. अंतोन कदो आलॅ ई तॉमाला मयती हॉता. भगून तॅनॅ अंतोनला कय विसारला नाय. अंतोनला का बॉलॉ..? काहा बॉलॉ..? ता सुसात नॉता.

शेवटी अंतोननॅ घसॉ खाकरलॉ पन अंतोनशा तॉंडातनॅ सब्द बार पडॅश्या अगोदरुस तॉमानॅ तॅला आथ वर करॉन थांबविला. 'अंतोन ! माला तडॅ यासा नाय. आमे बाहाबेनी ॲकमॅंकांकरता कत्तॅ मेल्याव.' तॉमा तॉंड्सा बॉल्ना आयकॉन अंतोनसा अवसान गळाला. तॉ थॉडॉ वेळ बॅहलॉ, तॅनॅ यांगातॅंगा बगीला आन उठॉन तुमानिला हात पुहीत पुहीत निंगालॉ.

अंतोन तॉमा घरातनॅ बायार पडलॉ, ता समोरश्या मनी-बायनॅ बगीला. ती अंतोनशा पुडॅ आली. अंतोननॅ तिला जकला हांगीला आन बोयलॉ, 'बय, तू तरी कय समजाव तॅला. तीओ तडॅ जीव अडकालॅ आन ऑ हांगातॅ... बॉलता बॉलता अंतोनला आवट आलॉ. डॉळॅ पुहीत पुहीत तॉ निंगालॉ. मनीबाय पायऱ्यांना हात टेकीत टेकीत तॉमा ओट्योर सडली, आतमीनॅ खिरली. तिला बगॉन तॉमा उठलॉ, तीऑ हात धरॉन तॅनॅ तीला खुरशीत बेव्हड्ला. बीआ कुनाव नाय पन तॉमा मनीबायसॉ सब्द खाला पडॉन देत नॉतॉ. कारन पयल्यान मनीबायनॅ तॅंन्ना बगील्ता. धानाऑ वाटॉ रॅलॉ गा ती तॉमाआ बयला हाक मारॅशी. तॉमाआ घारा तिगाळा खाशॅ वांदॅ. तॉमाई बय पशंडी घॅऑन धाव मारॅशी. तॉमाला मनीबायशॅ उपकार हॉतॅ...

'पॉरा..! कॅऑ ऑडॉ राग कॅलॅ. ई बगु.. ती जन्माई साल्ली. आहा करॉ नाका. हातसा गॅला तॅ परत यासा नाय. माआ वेडीइ एक शानी वार्ता आइक..' आहा बॉलॉन तीनॅ सांतानसॉ विषय काडलॉ. "सांतान, तुई बोठी बेन. पन तुला बय हांगडा हांबाळलॅ. बय तुमशी, भय धोविता धोविता

झोक जाऑन बाईत पडली. बुडॉन मेली आन सांतान तुमशी बय जाली.... पानी धमगाय लागलॅ आन जिव्या कय नाय.. बाबा तुमसॉ मुंबय गॅलॅ. तॉ शेलली गाडी पकडॉन यासॉ तॉ आलॉ गा तॅनॅ साउळ हाडलॅत तॅ सांताननॅ वयरॅशॅ. धान जाला गा, तुला, कोशीला ती उठवॅशी आन खावडॅशी.

तू शाळीत गॅल्या आन पानी धमगाय लागलॅ, सांतान मिंगरनॅ माआदरी याशी, मॅनकापडा मांगॅशी आन तुला शाळीतनॅ घारा घॅऑन याशी. तुमशा बाबाआ सौसाराला हातभार लाव्यादो, भाटात भाजी पॅरॅशी. पातेराती उठॉन, राटापुडशा भागाशी भाजी काडॉन हॉपारा बजारा धाव मारॅशी... एकदा तुतॅ इंबळोरशा जतऱ्या जावता, तु रडॉन रडॉन घर डोख्योर घॅटलॉता. पोतीनॅ पैशाऑ डबॉ फोडलॉ आन तॅतशॅ पैशॅ काडॉन तुला इंबळोरशा जतऱ्या घॅऑन गेली....

मनीबाय बॉलातोती आन तॉमा आयकातोतॉ. ऑडॅत वीज समकाली.. गराडॉ जालॉ. तही मनीबाय उठली. तॉमानॅ तिओ आथ धरलॉ. तीला पायरीओरनॅ खाला उतारवॅदो. मनीबाय शेवटशा पायरीवरनॅ खाला पाय दॅश्या पूडनॅ मांगी फिरली, आन तॉमाओर डॉकवॉन बोयली, ‘बाबा..! जाय. बेंनीला भॅट.. दऱ्यो रागावलॉ.. तिगाळा तॅला मरदावेलीनॅ समजाविला.. बंदवा, रागवॉ नाका, आन तुई हंद पार कर नाका.

ऑडॉ बॉठॉ दऱ्यो, पन तॅनॅ मरदावेलीआ आयकीला... खुब नाते हायदॅत पन बेंनी बाहासा नाता वायलास.’

तॉमा घरात आलॉ. मनीबायनॅ हांगीलता ता जकला तॅला दिख्या लागला. बायनॅ माआ करता का नाय कॅला. (तॉमा सांतानला बाय हाक मारॅसॉ) आन मॅ तीऑ राग कॅलॉ.. नाय नाय माला गॅला पाय. माई बेन माई वाट बगीतॅ आन तॉमा निंगालॉ... तॉ सायकल घॅऑन निंगालॉ. माकून एकदा वीज समकाली – गराडॉ जालॉ..

तॉमा सांतानशा वेहीत पॉसलॉ.. तॅला जडॅतडॅ लॉकांयो फुंडी भरलेल्यो दिखल्यो.. लोक तॉमाओर डॉक्या लागला.

सांतानशा घारा बोंबो पडल्यो. तॉमानॅ सायकल टाकीली... ‘बाय !’ अही हाक मारीत धाव मारली. गराडॉ जालॉ, वीज समकाली आन आब फुटलॉ. पानी हांगातॅ.. मॅ. तॉमा सांतानशा आंगळॅत पॉसलॉ. कुनॅतरी तॅऑ हात धरॉन तॅला ओट्योर सडविला. तॉमाला बगॉन कोशीनॅ सांतानला हाक मारली, ‘बाय, तॉमा आलॅ... तु बॉला ना ती.. सांतानसॉ परान डॉळॅतनॅ गॅलतॉ. भगून डॉळॅ उगडॅ हॉतॅ. ती जही तॅला हांगा तोती.. ‘बंदवा, माला माफ कर.. कुनॅतरी तॉमाला हात धरॉन खुरशीत बेव्हड्ला. तॉमानॅ दोनू हात डोख्योर ठोविलतॅ. तॉ एकुस बॉलातोतॉ, “माआ हातसा गॅला... माआ हातसा गॅला...”

# मॉराऑ लाडू – फ्रान्सिस डिमेलो, नंदाखाल

तिगाळश्या काळात हरावन ऊंगावलॉ गा लॉकाना जरा निशितायशी याशी. बवतेकांयो आवज्यो आटपॉन दाड्यो वाऑन हॉॲश्यो. भादव्यात भादवडीई लागवड करॅपोत बो कय काम नहॅसा. गव मिनॅ मिनॅ हाथात लांबी येळी घॅऑन केळीआ वाफ्यात डॉकाऑन याशॅ. कडे केळ लोटले, कडे ॲखादा लॉँगरा घॉआटलॅ गा का ता बगॅसा. ॲखादॉ थादॉ केळीआ पाठीओरनॅ फिरलॅ हायदॅ तॅ, तॉ माकून हारकॉ बांदयासॉ. नातॅ केळीआ हुंबाऑ कावसॉ मारॉन ऑडॉ घ्यासॉ आन येताना वाटॅत कून भॅटलॉ तॅ नवटाक मारॅशी गा हालात डूलात घारा यासा यापलीकडे बो काम नाहातोता.

बायकांना कॅरकातवार, हॅनापान्या आन सयपाक-पान्या तहांस कथानपागून धॉॲसा होडला तॅ घनास काम नहातोता. भाटाकुटात बो जा लागात नॉता. आखख्या वहरात तॅंन्ना जुरुकशी सवड मिळातोती. पन विहांबॉ कय मिळात नॉतॉ. बायको निशितायश्यो बेहेल्यात आंहां आमे कत्तॅस बगीला नाय. दॉपारशे जीवने खावने आट्पाले, ठावभांडा जाला गा ओट्योरती लोळयो वळया बॅहॅसा. तॉस विहांबॉ आन तास काम!

अहॅया निशितायश्या दिहा पानी जॅ निशितायसॉ लागलॉ तॅ मंग कय बग्यादोस नाका. ओट्योरनॅ ॲठा कून उतरात नॉता. दॉपारश्यो बायको लोळयो वळया बॅहाश्यो आन गवाऑ पत्त्याऑ खेळ रंगात यासॉ. तॅत जॅआ तॅआ सुलीपुडनॅ कांद्याऑ वास या लागलॉ गा हुमज्यासा, आज मॉरा लाडाऑ बेत हाय भगून.

कुपारी संस्कृतीत जे जे कय पकवान्ने हात तॅत मॉरा लाडाऑ नंबर खुब वरसॉ हाय. तिगाळा कुहनॉ जिन्नस कतॅ करॅसॉ याऑ काळवेळ ठरलॅलॉ हॉतॉ. मिंजॅ करज्यो नाताळशा हनाला, हिंगोळ्यो संज्यावशा हनाला. थंडीआ दिहात बड्डीआ पिठाॲ लाडू नातॅ खपश्यो. पाहाळयात मॉराॲ लाडू आन हुतळ्यो. कॉरॅज्मात तिखाट धापट्यो आन भोठ्ठ्या हुक्कुरवारा (गुड्फ्रायडे) ढॅस्का अहॅ आखख्या वहराऑ मेनू ठरलॅलॅ हॉतॅ.

हां, सामट्यो मात्र मनात येदॅ तिगाळा कारॅश्यो. दॉदाल आन रॅवाळा नवऱ्यो मायारनॅ हाऱ्या जादो करतोते. भंई वॅआदॅत ताहा पुहू, दुदाआ गॉड, हिताडू अहे पक्वान्ने हॉतोते. भंई घना करॉन भादव्यात वॅआश्यो.

मॉरा लाडाला मिनत खुब लागातोती पन खर्स बो येत नॉतॉ. हिरवी मिरी आन कोथमिरी जॅ होडली तॅ विकता कय हाडया लागात नॉता. सावळाऑ पीठ घरसॉ. पांडॅ कांदॅ घरशॅ आन उळदाई डाळू घरशी. हां मिनत बाकी जाम लागातोती. पान्याऑ जोर बगॉन लाडाऑ बेत हॉअॅसॉ. बायकां बायकांस ठरॅसा. गवांसा तॅत कय मन्ना नहॅसा. पन अॅखाद्या गवानॅ, तॅत बी कारबारॅनॅ जॅ बोयला, ‘आपलॅतॅ मॉराय लाडू कॅलॉशॅ तॅ’, मंग का बगॅस नाका. बायकांना शार पाय हॉअॅशॅ.

तॅआ दिहा जीवनेखावने ठावभांडे लवकर आटपॉन बायको मॉरा लाडूआ तयारीला लाग्याश्यो. हाऊ नातॅ घरातशी कारबारीन पयला काम करॅशी ता मिंजॅ उळदाई डाळ काडॉन ती साप करॉन भिजात घालॅशी. जकल्यात बॉठा काम मिंजॅ नाळ खव्याशे आन कांदॅ कापॅशॅ. त्यातशा तॅत आडसळ अहलॅलॅ आठ-दा नाळ काडॅशॅ, तॅ हॉडलॅलॅ नायद्यात तॅ गंवाला कुनाला तरी हांगॉन हॉडॉन घ्याशॅ. तॅ फोडताना मॅरॅदॅरॅ पॉंरां कॉंडाळा जमॅसा पानी प्यादो. कोडे जरी हरकाटिले तरी माह्यो कहयों माकून येतॅत तहे याशे पोरे. मंग जकल्याना थॉड थॉडॉ पानी द्यासॉ वर बी नाळाऑ बारकॉ बारकॉ तुकडॉ दॅऑन हापाटॉन लाव्याशे. नातॅ बायकांना नाळ खऑन द्याशे नाय. जॉडॉ खवीलॉ तॉडॉ तॉंडात.

मॉरा लाडाआ करता कांदॉ जरा बारीक कापॅआ लागातॅ. मोरलीओर तॉ कापॅसॉ जकल्या बायकांना नाय जमॅ. भगून जरा बोठ्यो दोन बायको कांदॅ काप्यादो घ्याश्यो. तळयोरशी पांड्या कांद्याई बरी आख्खी माळ लागॅशी. कूटूम बॉठ्ठा हायदॅ तॅ दोन तीन माळी मिंजॅ टोपलाभर कांदॅ लागातॉतॅ. बी मिंजॅ पांडॅ कांदॅ बुंबला आन बीआ मावऱ्या रसाहरी कच्चॅ खाऑन नातॅ मॉरा लाडूकरता नाय खपवीलॅ तॅ आगोठीत तॅ खराब हॉऑन, कुऑन खाला पडॅशॅ. तॅला जॉ घान वास यासॉ ना.. आय.. आय.. आय..! तॉ वास जहनी अजून नाकुटात हाय.

दोन तीन बायको नाळा मांगॅ लागॅश्यो. आख्खी परात भरॉन नाळ खविताना बायकांयो पाठी भरॉन येतोत्यो हायदॅ, पन तॅऑ कुन विसार करतोता. कांदॅ आन नाळाई तयारी हॉयापोत कुनॅ तरी सुल लाविलेली अहॅशी. पानी बरॉ उकाळलॉ गा तॅत पीठ बाफ्यासॉ. ई कामसुदा तॉडास जिकिरीआ. नॅमकॉ कॉडॉ पीठ घॅसॉ, पानी कॉडॉ घॅसॉ ई ठरवॅसा हाऊ नातॅ बॉठ्या बायकांस काम. पीठ बाफॉन जालॉ गा तॉ ठंडॉ हॉअॅशा पूडनॅस निसक्या घॅसॉ. पिठाई निसकन जोडी जास्ती तॉडा लाडूआ कवाट बरा. बाफनी, मळनी हारकी जाली नायदॅ तॅ लाडू फूटॅशॅ. कॉडा हांबळ्या लागातोता ना.

एकदा गा सब्बान तयारी जाली, हाऊनॅ पुरान साकॉन हाथाअॅस मीठबीठ, तिखाट बरबर हाय आंहां हांगीला गा जकले लागॉन लाडू भऱ्या लाग्याश्यो. कुन कवटे करॅश्यो तॅ कुन पुरान भरॉन तॅला लाडाऑ आकार दॅसा काम करॅशे. तॅआबनॅ लाडू लानॅ बॉठॅ हॉतॉतॅ पन सलातोता. अॅका पॅनाअॅ लाडू तयार हॉयात तंव सुलीओरसॉ सारनीतसॉ पानी उकळ्या लागॅसॉ. त्योर कुबड्डुर

ठॉऑन तॅमीनॅ कथला बशीत लाडूआ पॅना भरॅसा. पयला पॅना. सुलीओरनॅ  डॅवरॅश्या आदी गंव आन पोरे एकदोनदा सुली पूडॅ फेरी मारॉन अंदाज घॅऑन जाशे.

केळीअॅ हिरवॅगार आंगाठॅ आन खॉलॅ आदीस हादलॅलॅ अहॅशॅ. आथरी ओरती  आंगाठॅ टाकॉन त्योरती तयार लाडू पसरॅशॅ. पन तॅ घनॉ काळ खोल्योर रॅशॅ नाय. जकल्याई एक एक टुकिलॉ गा खपलॅ, पन तॉडॅत दुहरा पॅना रिकामी हॉॲसा. पुडशा तासाभरात लाडाई ई राहा पडॅशी. कुन शार शार तॅ कुन स स लाडू गपागप खाशे. तंव दॉपारसॉ शा आ हॉयासॉ. लाडूआ आन शा सा बरा जमातोता. पन कयांना तॅय कडीतोता.

लाडू आन शा सॉ कारिकम आटपालॉ गा कारबारीन बशीमीनॅ नातॅ खॉलॅत दोन-दोन शार-शार लाडू घालॉन पॉरांना मॅरॅदॅरॅ धाडॅशी. जकल्या बायकांना हांगॅशी गा कुनाकुनाला दोन दोन पायदॅत तॅ घॅआ. मंग दोन शार फुटलॅलॅ तॉडॅ रॅशॅ, मॉराय लाडू कांदॉ अहल्याबनी बो वखत टिकात नाय आन तिगाळा फ्रिज ब्रिज कडे का हॉता? भगून हांजोहांज खपव्या लागातोतॅ. हांज्यादो मॉराआ लाडुऑ कारिकम खतम.

बायकांदो ठावभांड्या ई ई राह पडॅशी पन ‘का मस्त लाडु जालॅत’, ऑड्या शाबासकी पुडॅ ठावभांडॅआ कईस वाटॅसा नाय बायकांना. बी मिंजॅ तॅआ रातसॉ सयपाक नहॅसॉ. तोडीस हुट्टी. आमा पॉरांना गॉडॅ मॉराय लाडु (मोदक) आवडॅशॅ भगून नाळात गॉड घालॉन शेवटसा एक पॅना गॉडॅ लाडुआ हॉॲसा. आमे  पोरे त्योर उडॉन पडॅशॅ.

मॅ लानॉ असताना या लाडुआ आन मॉराआ का नाता हायदॅ बरा ? ऑ प्रश्न माला पडॅसॉ. पन जरा बॉठॉ जाल्योर मॅरदॅरशा गावात परसादा आशॅनॅ गनपती बगॅ जा लागलॉ. तडॅ गणपती बाप्पाआ हाथा मोदक बगीलॉ. ‘गणपती बाप्पा मोरया’ ॲ शब्द कानोर पडॅ लागलॅ आण धॅनात आला, ॲ मॉराॲ लाडू नाय तॅ मोराय लाडू! गणपती बाप्पाॲ आवाडतॅ मोदक. आपल्या वाडवडलांना मोदक परवडन्या हारकी परिस्तिती नोती भगून तॅंइ कमी खरसाऑ ऑ मॉराऑ लाडू शॉदॉन काडलॅ. वेळ तॉहॉ खेळ बीआ का..?

या मॉरा लाडूआ हरी माई एक कडू आठोन हाय ती हांगील्या बिगर मॉराॲ लाडू खपॅशॅ नात. ८ ऑगस्त १९६४ सॉ दी. माला वाटातॅ हुक्कुरवार हॉतॉ. तॅआ दिहाशी रात गटारी अमावशा होती. हाकाळसॉ पान्याऑ जोर हॉतॉ पन पानी घनॉस अहॉ कय नॉतॉ. आमे हत्री न घॅतास शाळीत गेलते. तदनंतर पानी सुरू जालॉ आन वाडातुस गॅलॉ. पान्याऑ दी हाय आंहां समजॉन बायकांई मॉरा लाडूऑ बेत कॅलॉ. बायको सुलीपुडॅ लाडूआ तयारीत ओड्यो गुतल्योत्यो गा बायार वारॅनॅ कतॅ जोर घॅटलॉ ता तॅंन्ना कळलास नाय.

त्या दिहा पान्याआ जोडीला शक्रीवादळ पन आलता. दॉगांइ मिळॉन दीड दोन तासांत हॉत्या नवता कॅला. आख्ख्या आगरात एक केळ उबी ठोयली नाय. पान्यानॅ केळीए मुळे हुट्टे केलते. वारा वाया लागताबरबर जकले तापॅ लोंगरे पाठीओर घॅऑन आडवे जालॅ. तापॅस नाय ना आपलॉ आख्खॉ समाज आडवॉ जालॉ. आख्खा आपला आगार मिंजॅ एक बॉठ्ठॉ जब्बार दऱ्यो जालतॉ. रस्तॉ कुहनॉ, गटार कुहना बावखाल कुहना आन तळा कुहना कईस कळात नॉता. शाळा दॉपारा अरद्या दिहाशी होड्लोती खरी पन घारा यासा कंहां? दॉपारा तीन नंतर वाऱ्याऑ जोर जरा कमी जाल्योर जकल्या घरनॅ माहने ॲऑन तॅइ पॉरांना हारकाहुरका घारा हाडला.

घरातसा कुन मॅला गा आख्ख्या घरात हुताक कांहां आहातॅ तांहा वातावरन हॉता. जकले विसारात पडल्या हारके. जकल्याये तोंडे साप उतरलेले. बायकांए तोंडे तॅ बगवात नोते.

मॉराॲ लाडू कय बाफॉन जालतॅ बी पुरान आन बाफीलॅलॉ पीठ तॉहॉस पडलोतॉ. कय लाडू फुट्लोते जहनी रडतोतॅ. सब्बान अवकळा आलती. आतॅ त्योरती माहाट बॅहॅ लाग्लोता पन तॅआ लाडूआ बाजूला जाशी कुनाईस बिशाद हॉत नोती. कही हॉॲशी? आख्ख्या कुटूमाई आख्ख्या वहराई मिंनत पान्यात गेलती. आराथॉरॉ कईस रॅलॉ नॉतॉ. आमसा लक्ष एकहारका तॅआ लाडोर जातोता. बिशारॅ ॲकाकी पडलोतॅ. गंव ओट्योर हात ई बगॉन बयनॅ मुकाळॅॲ आमशा हाथा एकेक लाडू दॅऑन पटकान खादो हांगीला. मंग बायकांई जकला हामटीला आन नॅऑन ढॉरांना घायला. तॅआ दिहा मॉराॲ लाडू पॉरां नशिबा नॉतॅ, तॅ ढॉँरां नशिबा हॉतॅ.

जिगाळा जिगाळा घरात मॉराॲ लाडू हॉत्यात तिगाळा तॉ वारमोडीऑ दी आन तॅ लाडू आठवल्याबिगर रॅत नाय. बिश्शारॅ मॉराय लाडू..!

## सादु आन आपुन दोगे – सिरील मिनेझीस, मॅरभाट, आगाय

हाकोटे अंद्रेस दात पालीश करीत हिंदाळॅत भॅल्तॉ. दात सॉळॅदो कोलगेट नवता. पन सुलीपुडॅ राहाभर राखेडी होती. ती कामाला आल्ती. दात सोळता सोळता तॉ विसार करतोतॉ, ’माआ नशिबात कोलगेट कतॅ येदॅ कुना गाइ?’ बाबानॅ शाळीत घायलॉता पन ऑ एक दी पन शाळीत गॅलॉ नाय. शाळीतनॅ पळॉन इंटरवलला भारत टॉकिजला जकले शिनिमा तॉ बगॅसॉ पन ॲका पन शिनिमाऑ पूडसॉ भाग तॅला बगॅ भॅठलॉ नाय. ॲका वर्गातनॅ पुडशा वर्गात सरकॅसा ऑ कय नाव घॅ नाय. मंग का? बाबानॅ शाळीतनॅ काडलॉ आन तॅआ दरी अहलेल्यो शार भयी सरॅसॉ बिझनेस काडॉन दिलॉ. दिहा मांगनॅ दि गॅलॅ, पन अंद्रेसशी प्रगती भयशा पाठीओरनॅ नीहरात नोती. भय सारॅशी अन परातभर जीवॅशा पलिकाडॅ तॅला कइस करता येत नॉता. बाबानॅ तॅआ वराडा करता खटपाट केली पन याला पोरी दॅनार कून? भगून ऑ नीखळॉस रॅलतॉ.

निजल्योर आन जागेपनी पन तॉ सपान बगीतोतॉ. सपनात जाम पयशा वाळॉ हॉॲसॉ अन जाग आलीगा खिशात दमडी पन नाय भगून रंजी हॉॲसॉ.

बय तॅआ लानपनीस दॅवा घारा गेलती. बाबानॅ वाडविला. शीकशान हॉडॉन जक्ला दिला. पन बाबा कय जनमभर पुरनार हाय गा? हॉॲसा तास जाला अंद्रेस पस्तीस वहराव जालॉ आन बाबानॅ तॅइ साथ होडली, तॉ पन बयशा भेठीला दॅवा घारा गॅलॉ. अंद्रेसला भय सारॅशा पलिकडॅ कइस येत नॉता. भय पन दुइता येत नोवती, मंग का एकेक करॉन शारू भयो तॅनॅ विकिल्यो. आतॅ पडदॅ ता काम करतॅ अन मिळदॅ ता खातॅ. पन अजून पोत पैशावाळॉ हॉयासा सपान बगीतॅ.

“अलख निरंजन !”

या आवाजाय तॉ भानोर आलॉ. तॉंडाशी राखेडी तासडॅ थुकिली. समोर एक सादु ऊबी हॉतॉ.

‘अलख निरंजन !’

माकून तॅनॅ बॉंब मारली अन आपली झोळी अंद्रेसशा पुडॅ केली. आतॅ अंद्रेस तॅआ सादुआ झोळीत का टाकनार ? डॉब्याये हाडे? तॅनॅ हात जोडलॅ आन पुडॅ जा हांगीला सादुला. पन सादु कय पुडॅ जादो तयार नॉतॉ.

‘बाबा, माझ्याकडे काहीच नाही, तुमच्यापेक्षा माझी हालत खराब आहे.’

सादुनॅ एकदा त्योर बगीला आन मंग तॅआ घर बगीला आन सादु बोयलॉ, 'बाळा, तू मला काही देऊ शक्त नाही, हरकत नाही. आज मी तुला काही देणार आहे.'

आतॅसादु आपलॅला का देनार ? भगून तॅनॅ माकून हात जोडलॅ आन तॅला जा हांगीला पान सादु एकेक पाऊल टाकीत तॅआ ओट्योर सडलॉ आन अंद्रेसशा बाजूला हिंदाळॅत भॅहलॉ.

अंद्रया भय धॉया बावखालात जासॉ आन भय पानॅत भ्याशी तही इ भय (सादु) हिंदाळॅत भेहली. उठॅसा नाव घॅ नाय. सादु नॅ एक गलास पानी मांगीलॉ. अंद्रयानॅ तॅला पानी पान पाजीलॉ.

'मला तुझं घर पहायचं ?' सादुनॅ विनंती केली. अंद्रया घारा का अहनार दावड्याहारका. शारपास भांडे, एक पेटूला, एक मोडकी खुरशी, एक खाट आन एक तळा, तळोर अंद्रयाये शार शार मयनॅ न धोयलेले कपडे. ये कपडे बाईत टाकीले तॅ बाईसा आख्खा मावरा मरदॅ.

अंद्रयानॅ सादुला आख्खा घर दावडला. ऑट्यापासून सुलीपुड आन आंगळॅपासून मिंगार सादुला फिरविला. माकून सादु हिंदाळॅत ॲवॉन आस्साल मांडी घालॉन भॅहलॉ अन अंद्रयाला हात दावड्या हांगीलॉ. हात गांडीला पुहॉन तॅनॅ हात सादुआ पुडॅ कॅलॉ.

'...तुझ्या हातात धनयोग आहे.' सादुआ आयकॉन अंद्रयानॅ कपाळोर हात मारलॉ.

'... तू पैशाच्या राशीवर लोळतो.'

'आरॅ, aaडॅ फाटक्या सादरीओर लॉळता दी गॅलॅ आन ऑ पैशा राशीओर लॉळाते आहा हांगातॅ तॉ?' इ अंद्रया मनातशा मनात बोयलॉ. तॅआ मनात आला, लाथ मारॉन या सादुला हिंदाळॅतनॅ खालशावर पाडॉगा का? तॅनॅ पाय पन टुकीलतॉ. पन सादु पुडॅ जा बोयलॉ ता आयकॉन तॅनॅ पाय खालशा खाला ठोयलॉ.

'तुझ्या घरात पूर्वजांनी खूप धन, सोने, चांदी, पुरून ठेवली आहे आणि तू एकटा त्याचा मालक आहे. बाळा!'

इ आयकील्या बरबर ऑ धावात सुलीपुडॅ गॅलॉ. स्टो पेटविलॉ आन सादु बाबाकरतान वगळ शा घॅऑन आलॉ. एक टाइम आहा हॉता, नुसत्या दुदाव शा अंद्रया घारा बनतॉतॉ. पन आतॅ टिमकॉभर पन दुद तॅआ घरात नॉता. शा पिल्योर सादु उठलॉ आन जा निंगालॉ, तहॉ अंद्रयानॅ माकून सादुला हिंदाळॅत भेवडला आन विसारला.

'सादु बाबा एकदा ते धन नेमकं कुठल्या कोपऱ्यात पुरलय ते सांगा. तुम्ही मागाल ते देतो.' सादु माकून हिंदाळॅत भॅहलॉ आन बोयलॉ, 'ते धन कुठल्या कोपऱ्यात ठेवलय ते मी सांगू शकत नाय अन ते धन तुला हवं असेल तर मला या घरात पूजा करावी लागेल. तीन दिवस पूजा केल्यावर

चौथ्या दिवशी तू घरात खणायला सुरवात कर, सात दिवसांच्या आत तुला धन सापडेल. तुझ्या इच्छेनुसार तू मला दक्षिणा दे.'

"अलख निरंजन!"

बाबा घरात यावे, लगेच पूजेला सुरवात करु.' अंद्रयाला उतळी पड्लोती.

'पूजा रात्री बारानंतर सुरू करावी लागते.'

तॅआनंतर सादुला अंद्रयानॅ घरात घॅट्ला. सादु खाट्योर आडवॉ जालॉ. आन अंद्रया संयपाकाला लागलॉ. खुराडॅशी एक कोंबडी काडली आन ती रांदीली. सादुनॅ आडवॉ हात मारलॉ. वरलॅला अंद्रयानॅ खाला. बारा वाजलॅ गा सादु पूजा सुरू करॅसॉ हाकोटपोत पूजा सलॅशी. मंग दोगे हायत्याशे. तीन दी पूजा जाली. रॉजशी एक कोंबडी कमी होतोती. अंद्रयानॅ बडदास्त ठोयलती. उदारीओर सामान हाडॉन हुकाळीइ उदारी केल्ती. आठ आठ दी आंग न धॉनारॉ अंद्रया सादुला आंग धॉयादो पानी तापवॉन देतॉतो. हाकोट जाली गा हाथात टमरेल घॅऑन सादुला बावखालात परसाकडॅ नेतॉतो. तॅय पाय दाबॉन देतॉतो. एकदासॉ सवथॉ दी उजाडलॉ आन मावाळलॉ. अंद्रया रातशॅ बारा वाजॅशॅ वाट बगीतोतॉ. रातशॅ बारा वाजलॅ आन अंद्रयानॅ कुदळ घॅऑन खीनॅदो सुरवात केली. हप्पेरात खीन खीन खीनॉन पन कय हापडला नाय. अडॅ सादु गोकुळात हॉतॉ.

खाय पे आन लॉळ. दुहरी रात गेली बवतेक घर खीनॉन जालता पन तॅला तांबडॉ पसॉ पन हापडलॉ नाय. आतॅ एक कॉपरॉ रॅलतॉ, तॉ उद्या रातीला खनलॉ गा या अंद्रयाव अंद्रयाशेठ हॉनार या कल्पनॅय अंद्रया आडवॉ जालॉ. आज जरा घना काम कॅल्या पायान अंद्रयाइ धूम नीज लागली. शेत पडलॉ तिगाळा रातशॅ आठ वाजलोतॅ. तॅनॅ अँगातँगा बगीला पन सादु कय दिख्लॉ नाय. गावात फिरॉन आलॉ पन सादुऑ पत्तॉस नाय. एकदम तॅइ नंदार पेटूल्योर गेली.

पेटूला उगडा हॉता. तॅनॅ पेटूला बगीला आन बद्कन खाला भॅहलॉ. पेटूलॅत ठोयलेली बयशी हॉन्याई बोरमाळ आन कानाश्यो वाळयो आन बाबाइ हॉनॅइ अंगठी आन पय पय करॉन जमलॅलॅ साडेबारा हजार रुपय घॅऑन सादु फरार जालतॉ. वाये, इ विकती कळ आपुन घरात ठोयले इ कळॅदो बरॉस ऊहुर जालतॉ. तॅआ आख्खा घर खीनलॉता. बॉँबाट हॉॲशा आदी खडॅ बुजवीलॅ तॅ पात. अजून दोन दी खपॉन तॅनॅ खडॅ तॅ बुजवीलॅ पन सादु नॅ कॅलॅलॉ खड्डॉ कॉहॉ बुजवॅसॉ..?

# नॉस्टॅल्जिया....! – संगीता वाझ.

सादारन १९८४-८५ मा मामानॅ SONYऑ कलर टिवी हाडलॉ अन मामारा घरात नुसती जत्रा फुल्या लागली. तिगाळा गावात ॲक-दॉगा घारास टिवी अहॅसॉ आन तॉ पन ब्लॅक एन व्हाईट. कलर टिवी मंजॅ बो भारीस गोस्ट. तॅ गावशॅ गव, बायको, तरुन आन टारेटुरे.. बवतेक आख्खॉ गाव दर हीनवार-आयत्वार टिवी बग्या जम्या लागलॉ. तिगाळा हीनवारॅ हांसॉ ४.३० ला मराठी आन आयत्वारॅ हांसॉ ५.३० ला हिन्दी पिच्चर दावडॅशे. एक दी साप्ताहिकीत हांगीला गा, हिन्वारॅ 'पिंजरा' आन आयत्वारॅ'दिल अपना और प्रीत पराई' पिच्चर हाय.

जाला... गावात खैताळॉ पडलॉ. जकलेस हीनवारशी वाट बग्या लागले. बॉठ्ठ्यांना उठ-बॅहॅ लाग्लोतीस पन तॅँआहून जास्ती आमा लान्यांना होस जाल्ती. आमाला पिच्चर मीनसा बो कय कळात नॉता. पन तिगाळा अमिताबच्चनशी ढीश्युम ढीश्युम फायटिंग बग्या आवडॅशी. हां, तिगाळा तॉ आमश्याकरता अमिताभ नाय, तॅ अमिताबच्चनुस हॉतॉ. शेट्टी, प्रान, प्रेम चोप्रा यांसा कुसकापन आन हेमामालिनी, रेखा यांशॅ नास-गानॅ जाम आवडॅशॅ. आमाला ता तॉडास कळातोता.

ॲकदासॉ हीनवार उजाडलॉ.. शार जालॅ आन मामाआ माळोर हळूहळू गावकरी जम्या लागलॅ. साडेशार पोत हॉल फुल्ल. टारेटुरे, बायको, तरुन भुयोर. डोकरे आन घरधनी वरती खुरशीत. पिच्चर सुरु जालॉ. गान्याला शिट्यो पड्या लागल्यो. संदयाऑ तॉ वॅगळॉस विचित्र नास बगॉन जाम हावा येतोता. पन जकले बोठे माहने एकशिती हॉऑन पिच्चर बगीतोते बगुन आमेपन गपशुप बेहेले.

हळूहळू पिच्चर रंगात आलॉ. मास्तरला पोलिसाई धरलास गा आन सॉक्काट जाला. 'सू... सू..' ऑहॉ नाकुट सड्विलॅव आवाज या लागलॉ. तोंडोर लुगडॅव पदर धरॉन बायको रड्या लागल्यो. एकदासॉ पिच्चर खपलॉ. जॉ तॉ 'बो भारीस पिच्चर' बॉलात बॉलात जिनॉ उतरॉन घारा गेले आन अडे मामा पॅटलॉ. मामाआ आख्ख्या हॉलभर आन बीथीओरनाकुट हिकारलॅआ शित्र. मामाआ जीवासॉ नुसतॉ संताप. दुहरॉ दी आख्खॉ सफाईतुस गॅलॉ.

हांश्यापारा माकून तेस लोक. तिस गर्दी आन तहीस बैठक. फक्त पिच्चर आतॅ तॉडॉ वायलॉ. पिच्चर सुरु जालॉ. राजकुमारमिंसॉ डॉक्टर बगवात नॉतॉ पन मीनाकुमारीमिंशी नर्स बगॉन मनपॉट भरातोता. पिच्चर रंगात आलॉ. एकासे बढ्कर एक गानॅ. डॉक्टरसा लगीन जाला. ती नादीरा आलीस गा आन माकून सॉक्काट जाला. हळूहळू 'सू..सू' ऑँहॉ नाकुट सडवीलॅव आवाज, तोंडोर लुगडॅव पदर धरॉन बायकाआ रड्ना....

आतॅ मात्र खुरशीत बॅहलॅल्या मामाआ डॉखा फिरला..

“इखरिश्यांदो- अक्करमाश्यांदो रडात्या कादो. ? तॉ पिच्चर हाय. खॉटाय ता जकला. काल मा घराई वाट लाविली तोडी बास. आज कुनॅ नाकुट हिकारला तॅ परत अडे अज्जीबात उबी करॅसॉ नाय आत्तॅस हांगॉन ठवीतॅ...!”

मामानॅ आहा हांगता बरबर बिशाऱ्यो बायको रडता रडता पदरालास............!!

पुडश्या आयत्वारॅ जकल्या लाडकॉ अमिताबच्चनसॉ ढीश्युम ढीश्युम डॉन हॉतॉ ना... रिस्क कुन घेनार ना..!




# माळयश्या बंदोरनॅ - ईनास तुस्कानो, गाहा, ९२२६७६४३७८.

नावात का हाय... ग्रेट रायटर विलियम शेक्सपीयर, त्या "रोमीयो आन ज्युलेट " नावाश्या नाटकात हांगातॅ....की नावात का हाय...? या ऊल्टा एक बो बॉठ्ठॉ फिलॉसॉफर हांगातॅ... या जगात तुमाला जक्ल्यात प्रिय नाव जॅ कुहना वाटातॅ हायदॅ... तॅ ता "तुमश्या पॉत्या नाव."

१९८३ साल. मॅ १०वी ला हॉथॉ 'होली क्रॉस हायस्कुल, निर्मळ' ला. ऑहॉस एक दी फ्री लेक्चर हॉथा. वर्गात टिचर आली नोती. मॉनिटरला कुन झ्याट जुमानीत नॉता. आख्ख्या वर्गात नुस्ती धम्मासकडी सल्लोती. "धनी नाय पाशी, त्या शेत कुन कशी." पाखे जे फुटलोते सगळ्यान्ना. कारन १०वी ला होथे ना ! पॉर तॅ पॉर बाबा. कारन तॅ निंबरमुंडुॅस. पन पोऱ्यो पन कय 'कमी दिहाश्यो' नोत्यो. त्यांई तॅ मावरा बजारुस भरलोतॉ वर्गात.

आमश्या वर्गात फ्रान्सीस नावासा पॉर जामुस अतरंगी. मिमीक्री करन्यात एक नंबर. ता ऊठॉन फळ्या वरती 'क्ष' टिचरशी मिमीक्री करतोता. बरे दा-एक मिंटे आमी ती मजा बगीतोते. प्रिंशिपॉल मस्कर्निस फादर मांगनॅ यॅवॉन कतॅ दारा ऑळ्या उबी रॅलॉ ता आमश्या कुनास गाई नाय. बरा मिनीट बर फादरनॅ त्यायॅ वांदर-साळॅ बगीलॅ आन बोलवीला त्याला वर्गा बार. पयलॉ फादरनॅ त्याला  ठेवनीत्सॉ परसाद दिलॉ.फादरशी माऱ्याशी पद्दत मिंजॅ, मुठ बंद करॉन मिंसा बॉट आन आंगठ्या मॅरसा बॉट पॅरात्नॅ वाळॉन टपकन टाळु मिनॅ टॉलॉ. या वाराला एक तॅ डॉळ्या पुडॅ काजवे समक्याशे....नाय तॅ टुमनीत मुतॉ.

बारक्या फराशाई (फ्रान्सीसशी) खॅम बॉठ्ठ्या फराशीनॅ (फादरनॅ) हारकी हुरकी घेथ्ली. आन लगोलग त्याव हावुरॉ पन कॅलॉ, मिंजॅस वरांड्यात मांडी घाल्या लावीला. फादर बिया वर्गोर जादो वळ्या लागलॉ आन परत मांगुलवाटॅ फिरलॉ. आमाला वाट्ला फ्रान्सीसशी 'घोडी आतॅ हम्दावली.' फादरनॅ परत त्याला तॉड्यास रागायॅ विसारला, "नाव का रॅ तुवा ?"

तॅनॅ 'फरशा' हांगता खुटी आमश्या बॉठ्ठ्या फरश्या (फादरश्या) पॉटात केळे कालवाले. तॅनॅ बारक्या फरश्याला ताबडतोप शिक्षा माफ केली. ऊठवीला आन त्याला हांगातॅ, "कॉडा मस्त नाव दिलॅ तुवा बय-बाबानॅ तुला ! क, त्या नावाशी बदलामी करता ? आपला फरांशीस नाव कॉडा ग्रेट हाय. नाका त्या नावासॉ सत्त्योनाश करॉ. नाय तॅ नाव तरी बदल तुवा आजपासून. आन आजपासून पुडे खोडी करॉ नाका.  त्या पाठीत प्रॅमायॅ थॅपॉ मारलॅ न त्याला हांगातॅ जावॉन जाग्योर बॅहॅ हॅवसॉ दॉक. फादरला त्या पॉत्या नावासॉ कॉडॉ अभीमान. आन यॉ वॅडॉ शेक्सपीयर का हांगातॅ, जॅ नावात का हाय भगुन ?

# हाकर जाले हाकर – जोसेफ डाबरे (जेडी), निर्मळ

हाकोटशॅ नव-साडेनव जालॅ हायदॅत. बझार करॉन मॅ घारा ॲवॉन इंधाळॅत बॅहॅलतॉ. बझार बरॉ जालतॉ भगून स्वारी खुशीत ओथी. तव आगू फास फास मिंजॅ जवळ जवळ धावातूस आलॉ. आरॅ पेद्रु पटकान कपडे कर सल, आपलॅला आगाय जासा हाय. कादो रॅ? मॅ विसारला.

कपाळोर हात मारीत आगु बोयलॉ, 'आरॅ बाहालॉ कहॉ, काल फादरनॅ मिसोर सूचना वाशीलती ना, आपल्या बँकेने फूल बॉडी चेकअप ठविले. आपुन फकस्त दा रुपय भरॅशॅ वरशॅ बँक दॅनार. नायतरी आपुन बॉलातॅवुस, बाकी बँकेत, सल पटकान. आपलॉ नंबर आगायश्या सेंट तेरेझा हॉस्पिटलला लागलॅ.

माइ कय जाशी इंच्छा नोती, पन आयकॅदॅ तॉ आगु कॅदो. मॅ घरात जाऑन नवा पांडा सदरा सड्विला आन इंबळोरश्या नाक्योर अर्नाळा बस पकड्या गेले. बस येता बरब्बर मॅ मिंगुला हांगातॅ, 'पैला आत्मीश्यांना उतरुंदे पन ॲला सड्याशी घाई. माला तानला. तव निर्मळला उतारनाऱ्या तॅआ कोळन्या टोपल्यास्सॉ मावरॅऑ पानी माआ सदरॅओर हॉळलॉ आन नव्या सदरॅइ वाट लाविली. आपल्या भाशेत हांगॅसा तॅ, "माआ सदरॅइ xx xxx" तुमाला हुमजालॅ हायदॅस.

कहे बहे आगाय पोसले. तडे पोसले तव का बगॅसा. शिलू, देगू, पावलू, नानू, शिमा, दुमा जकले लायनीत उबॅ हात. अस्ते अस्ते लाइन पुडॅ सरकात गेली आन माऑ नंबर लागलॉ एकदासॉ. नर्सनॅ रगात घॅआ करता हुई टोशीली. तीनॅ एकेक करॉन तीन शाव्ने भरले.

मॅ विसारला, 'शीश्टर, कॉडा काडता बाय, वीकॅ गा का?" ती बिशारी आहात आहात बोयली, 'नाही काका, वेगवेगळ्या टेस्टसाठी लागते तितकंच घेतलं. मंग तीनॅ आथाला स्पिरीट लाऑन पट्टी लाविली आन माला हांगातॅ, उद्या या रिपोर्ट न्यायला.

माआ पॅाटात पडलॉ फाळ आन मनातश्या मनात मॅ होडली मिंगूला एक गाळ. या मायला उद्या माकून ऑड्या लाम यासा मिंजॅ, काय ती बस, काय ती गड्डी, काय त्यो कोळनी आन काय तॉ परवास. पन मिंगू हांगातॅ, याआस लागॅसा. तॅआबिगर आपलॅला कय हाय गा नाय ता कळॅसा काहा. मॅ हांगीला,' माला का हाय ता माला माइत हाय. माला दोन पोऱ्यो आन दोन पॉर. तुला माइत नायदॅ तॅ तू ये. मिंगू बोयलॉ, आरॅ अक्करमाशा, आपलॅला का हाय मिंजॅ, कय आजार बिजार हाय गा का ता रिपोर्ट वरनॅ कळदॅ.

मंग आमी निंगालॅ. आगाय नाक्योरनॅ अर्नाळा वसय पकडली अन नाळा स्टॉप हांगीलॉ. तडॅ उतरॉन पेट्रोल भरला अन हालात डॉलात घारा पॉसलॅ. दुहऱ्या दी माकून तीस बस अन तॉस मावरॅऑ पानी घॅऑन आमी हॉस्पिटलला पोसले. मिंगूनॅ तॅअॅ घॅटलॅ अन बार उतारलॉ.

मॅ आत्मीनॅ गॅलॉ तॅ डॉक्टर बोयलॉ, या काका बसा? मॅ बॅहॅलॉ. तॉ डॉक्टर माआ तोंडोर बगीतॅ आन रिपोर्ट बगीतॅ. मॅ विसार कॅलॉ जालॅ का? डॉक्टर काय झालाय? डॉक्टर नॅ तॉँड नहावीला. मॅ विसार करतॅ दोन दी जालॅ संताप माऑ सल्लॅ,

तीनशे रुपासा सदरा माआ खराब जाला आन ॲनॅ कादो तॉँड नाहविलॅ हायदॅ.

तव डॉक्टर बोयलॉ, काका, डायबेटीस. माआ धॅनात कय आला नाय ई तॅआ धॅनात आला भगून तॉ बोयलॉ, ‘काका तुम्हाला हाय शुगर आहे.’ मॅ जरा रागातूस बोयलॉ, ‘डॉक्टर का हांगॅसा हाय ता मराठीत हांगा’. तव डॉक्टर बोयलॉ, ‘काका तुमच्या रक्तात भरपूर साखर आहे. औषध घ्यायला लागतील.’

या मायला आडॅ शा मीनॅ टाकॅदो हाकर नाय आन रग्तात हाकर कडनॅ आली. ऑबडा ऑखांद लीऑन दिला. मायला इंधाळॅत बॅहॅलतॉ तॉ बरॉ हॉतॉ, खाली फुकाट या मिंगूआ नादी लागलॉ.

# आपल्यो कुपारी परंपरा – पायस आलेस तुस्कान, घॉहाळी, नंदाखाल

## अयलॉ पयलॉ माना सॉ जावाय

आपल्या कुपारी आळीत संस्कृती आन नाता जुळवनीला जाम मान दिलॉ गॅलॅ. तॅत जावाय सा नाता मिंजॅ कुटुमांसॉ खास आना अन मानाऑ पावनॉ. आपल्या लेकीऑ धनी आन हाय जकल्या मनोमनी. हारोड मिंजॅ जावाय करता एक परकारॅ मानसन्मान आदर आन प्रेमा ठिकान. जावाय हारोडी यासॉ हायदॅ तॅ एक परकासॉ हनुस साजरॉ कॅलॉ जातॅ ऑडॉ तॅऑ मान हाय.

जावाय हारोडी आलॉ गा हाऊ हरॉ जाम खुश हॉअॅशे. तॅआ पसंतीआ खानापॅना याइ काळजी घेट्ली जाशी. तॅआ करता गावठी कोंबडॉ अन बकऱ्याइ कांजी होपाऱ्या बझारशी घ्याशी. आपलॉ जावाय आन लेक सुकी रेऊंदे ओडीस बयबाबाइ इच्छा.

भगून जावाय आलॉ गा का करॉ आन का नाका अही तॅइ गत हॉअॅशी. तॅँआं बॉल्ना एकुस, 'जावाय, खा ना बाफला ताता! आन टिकवॉन ठ्वा आपला नाता, बगीत रॅआ आमश्या लेकीओर येता जाता.'

कतॅ हीनवारा बझारातसॉ कोंबडॉ हाडलॉ गा गावात बॉँबाटी फुटली गा अमुका जावायासा यॅना आयत्वारॅ हाय मिंजॅ तॅआ घारा हन हाय. लान्यापासून तॅ बॉठ्ठ्यापोत जकले तॅइ सॅवा करॅ दो.

कते कते जावाय वरश्या वरनॅ गम्मत भगून बॉलॉन जासॉ,'हरॅँदो ! कदो ऑ पान्याहारकॉ खर्स मा करता लावीलॅ.' पन तॅआ मनातशा मनात लाडू फुटातॅत, आतमीनॅ तॅला इ जकला बरा वाटातॅ, अॅका जावायनॅ बगु कहे जकले कामाला लाविल्यात ते.

आतॅश्या पिढीमीनॅ यो जुन्यो पद्दतीनॅ जकला काम पाडलॅ. रित रिवाज थॉडॉ बदललॅ पन जावाय सॉ मान थॉडॉ पन कमी जालॉ नाय. आतॅ शॅ जावाय आलॅ गा पयलॉ शा-पानी अन अडश्यो तडश्यो गोष्टी रंगल्यो गा तॅआ मीनॅ बकऱ्या मुंडीऑ सुप.

मंग हाळॉ आपलॉ बडवायझर नातॅ विस्की बाठली काडॉन तयार. जोडीला ड्राय फ्रूट नातॅ भुजिंग आन जमलास तॅ भुजलेली दातळ. जावायशॅ हारोडी जकले ऑडॅ लाड हॉतॅत कारन जावाय मिंजॅ नुसतॉ पावनॉ नाय तॅ आपल्या पोरीशा माथॅआ मिनसा गुलाबा फूल आन खांद्याऑ खांदॉ हाय. तॅऑ मान मिंजॅ हारोडीशी शान.

सार – जावायसॉ हारोडी ठवीलॅलॉ मान आन कॅलॅलॉ शा पानी आपल्या दॅशाइ रित आन संस्कृती हाय. तॅआतनॅ दिखानारा जकल्या प्रेम, आपुलकी आन आदर याऑ तॉ त्रिवेनी संगम हाय. इ संस्कृती आपलॅत अजून टिकॉन हाय इ गर्वाइ गोष्ट हाय. जावायाबद्दलसा प्रेम हारोडी आहास टिकॉन रेऊंदे इ ब्येस.

## पॅठ

आपल्या अडे कुपारी समाजामीनॅ एक प्रथा आन रिवाज पयल्यापासून हाय गा आपल्या नातलगामीनॅ पॅारापोरीआ लगीन जवळ आला गा पोरी हाऱ्या कय गॉडधॉड आन जावायला गावठी ताते न्याशी रित सुरू हाय.

तॅआ रीतीनुसार आमश्या ॲका पावन्या पोरी घारा जासॉ आमसॉ बेत ठरलॉ अन जकले मीळॉन मिंजॅ भावजय आन तीन नळद्यो यांशी जाली मीटिंग आन लाविली तडे जादो सेटींग. डॉखॅत विसार आलॉ गा जकल्या मनून तडे नॅसा का? कुन हांगातॅ हिंगोळ्यो आन तळनायो रोटयो. तॅ एक बॉलातॅ खाजॅ नातॅ करज्यो. एकमत कय पटकान हॉअॅ नाय.

पन एकदासॉ मुहूर्ताऑ नाळ फुटलॉ अन उंबरगोठनी वरनॅ एस के मीनशॅ दीडशे भठ्ठी पिठाअॅ लाडू घॅऑन जासा ठरला. तही दुकानदाराला ऑर्डर दिली अन हीनवारॅ हांश्यापारा जासा ठरला. पोरीआ घारा का नॅसा ई टेन्शन आलता तॅला विहांबॉ मिळालॉ.

हाकोटे उठलॉ थोडे घरशे कामे खपविले कारन हांशापारा माला बायकूहरी डायवर मनून तिला तडे घॅऑन जासॉ उजगूरॉ मनात हाय. इ आमशी गेलती कामाला आन दॉपारशी याशी होती. तिला नाक्योरनॅ हाड्या पन लागॅ मनून मॅ मॉडकॉ मारलॉ गा अन थॉडॉ कथनात पडॅ गा नाय ऑडॅत हाळयानॅ फोन कॅलॉ अन हांगीला भावजी एक लफडा जालॅ, मॅ नाखॉडॉ भॅलॉ या वयात मा का लफडा हापडला हायदॅ..?

तॉ हांगातॅ ताहा कय नाय ना, ‘आपुन काल जॅ लाडू हांगीलॅत तॅ कॅन्सल करता येदे गा ता विसार’. पूडॅ तॉ बॉलात रॅलॉ, ‘आपुन जडे लाडू द्या जाशे तडे ई रित मानीत नाय. भगून आपलॅला कय जासा हॉयासा नाय. इ आयकॉन माआ पॉटात आलॉ फाळ. आतॅ का करॅसा. फुकाटशी या दीडशे लाडाई गळ्यात पडली माळ.

दुकानदाराला खॉटा हांगीला गा आमे जॅआ घारा लाडू धाड्योवतॅ ना तॅंआ बाजूला मरान जालॅ तॅ ऑर्डर कॅन्सल हॉयदॅ गा. तॉ हांगातॅ ऑडॅ लाडू मॅ कडॅ न्यासॉ. मा पन नुकसान हाय. तॅनॅ पन कोंबडी हारका आंग पाखडला अन जकल्यो मनायो आशा मावळल्यो.

माई बायकू कामोरशी घारा आली तॅ तिला इ घडलॅला रामायन हांगीला की आहा लफडा जालॅ अन आतॅ निभाव्या सा काहा. डॉखॅत चक्रे घुम्या लागले. ई लाडाआ गाडा ऑरॅसा कडे. मनात शंबर विसार आलॅ गा आतॅ लाडाऑ वजावटॉ कहॉ निस्तारॅसॉ.

एक मत आला गा आपल्या बाजूश्या वृद्धाश्रमात नॅऑन दॅऑ पन मनात घाबरॉ पन आलॉ गा तॅआ डॉकऱ्यांना कडे हाकर वाड हायदॅ आन लाडू खाऑन त्यांसा कय जाला तॅ आपला नाव पीकॅसा. तॅबनॅ बेत पाडलॉ. हाळयाला फोन कॅलॉ अन हांगीला तॅआ मीनशॅ तीसेक लाडू ने आन गावात मीटिंग हाय तिगाळा वाट, तॅ तॉ हांगातॅ ‘पन! लाडू वाटॅसा कारन का हांगॉ?’

मॅ तॅला बोयलॉ ,’ऑ आपल्योर आलॅलॉ परसंग हाय तॅ कारन कय शॉद्या लागॅ. एक काम कर हांग ऑडॅ दी जालॅ पॉट कय कॅल्या साफ हॉत नॉता. तॅ रातसा एंडेल घॅटलोता ता हाकोटे लागला तॅआ खुशीत लाडू वाटीतॅ.’ हांशापरा ॲका पावन्याव फोन आलॉकी आहा कय नाय. तुमाला कुनॅ तरी खॉटा हांगीलॅ. इ आयकाता खोटी माआ जीवात जीव आलॉ अन दीडशेपैकी अर्दे लाडू मनातशा मनात फुटलॅ.

आमशी नावळ तॅंआ घारा निंगाली. तडॅ शा पानी जालॉ. निंगताना मेसुर सा खॉका अन भुजिंग सा पाकीट आमश्या हाता दॅऑन आमशी रवानगी जाली. अहया परकारे आमश्या लाडूला आलॉ स्वीट ट्विस्ट.

# लाल लुगड्याई हाईल – फ्रँक मिरांडा, उमराळा

आपल्या वसयश्या संस्कृतीऑ शॅहरॉ कोकनी भागापेक्षा वायलॉ हाय. यामांगसा कारन मंजॅ पोर्तुगीज आन नंतर आलॅला इंग्रजा राज्य. पोर्तुगीजांबनॅ आपल्याअडॅ ख्रिश्शन संस्कृतीआ बी पडला. जॅतनॅ नवॉ धर्म आन संस्कृती जन्मा आली. देवळा घाटा आवाजात वाडलेली पिढी, ख्रिस्ती उपास – हन आन संस्कृतीनॅ वसयशी आपली एक वायली ओळख तयार केली. सुरवातीला पोर्तुगीज शैलीत अहलेली ख्रिस्ती संस्कृती हळूहळू एक खास 'वसयशी शैली' बनली. ३०-४० वहरा आदी, या वसयश्या घराघरात एक नजारॉ दिखॅसॉस दिखॅसॉ. आंगोर लाल लुगडा, कानात-गळ्यात डागिनॅ (हिरान-बेतीन-वाळयो) घालॉन दापुडॅ बेहेलेली दादी. तीआ तोंडोर वया मुक गाठॉडा ऑथा, पन मनात पराथना. दादी नुसतॉ घराला आधार नोती तॅ ती तॅआ काळश्या श्रद्धेई साक्षीदार ओथी.

मा मामरश्या दादीला गावात 'लाल लुगड्याई दादी' भगून ऑळखॅशे. ती जकलॅत लाल लुगड्याहारकी उठॉन दिखॅशी. ती बो बॉलॅशी नाय, पन ती आख्ख्या घरात भरलेली अहॅशी. ती एकटी नोती, पन एकाकी ओथी. तीयो बेंनी, मैतरनी दॅवा घारा गेलत्यो. नातोंडे कायम इंग्लिश बॉलॅशे आन देवळा मिसा आयक्या नाताळ नातॅ लग्नादोस जाशे. ती रॉज हाकोटे चर्चशा रस्त्याला डॉळॅ लाऑन बॅहॅशी. तीइ श्रद्धास्थान देवळा उश्शा मनोरॅत आन घाटा आवाजात ऑथा. पन शरीर तीआ सोबती नॉता. ती पराथना करॅशी, नुसत्या दॅवा करता नाय, तॅ घरश्या जकल्या करतान. तीऑ देव डोख्योर नुस्ती खून नाय काडॅसॉ, तॉ तीआ जीवनात दपलॅलॉ ऑथॉ. उपासात, सेवेत आन जकल्या आयकनॅत. ती धर्म वागनॅत ऑथॉ. कुडा घरात वाडलेली दादी आतॅ मार्बलश्या ठंड्या भीतीत घालवाली. तीऑ नव्याला विरोद नॉतॉ पन सॉताऑ जुनॉ संवसार घालवालॅआ दुख जरुर ऑथा. हिकलेले पोरे तिला जुनाट समजॅशे. तीनॅ जक्ला आयकॉन घॅटला. ती मरनाला घाबरॅशी नाय, ती तॅ तीआ दॅवाइ इच्छा ओथी. पन ती एकटी रॅदो घाबरॅशी. मरना आदी ती नायटीत रेली. तीआ लाल लुगडा कबाडात दूनॉन ठोईल्ता. कतॅ-कतॅ ती ता लाल लुगडा दापुडॅ हुकात टाकॅशी. तॅआ लुगड्यात तीऑ जीव, तीऑ देव, तीआ जग जक्ला हाय. एक अहॉस दि उजाडलॉ, पन तीआ जीवनात कायमसॉ काळोक पडलॉ. तोंडोर हावा आन बाजूला तीआ लाल लुगडा. तीआ आंग ठंडा पडला. डॉळॅ बन जालॅ, हालसाल थांबली, पन तीऑ विश्वास कायम रॅलॉ.

आज आपल्यो लाल लुगड्यायो दादयो नहल्यो तरी जुन्या घरा ओट्योर, हिंदाळया झुलुकीत आन देवळाऑ घाट वाजलो गा त्यो अहल्याव भास ऑथे. ऑ वारसॉ नुसतॉ पॉशाखात नहातॅ, तॉ आपल्या मनात, वागनॅत आन पराथनेत आहातॅ. जॉ कुनाला आयक्या ये नाय पन पन तॉ आहातॅ.

# युटुपवर दिलॅ आन वाट्स अपवर आलॅ - ऑल्विन परेरा, नानभाट

घनी नाय पन एक पंदरा-वीस वहरा पुडशी गोश्ट, आज समाजात लॅाकांदरी कार हात. तिगाळा तॉडॅ पन गावात मोबाइल नॉतॅ. इनकमिंग कॉलशे पैशॅ लागातोतॅ. लॅंडलाइन आन मंग टाटा रिलायन्स CDMA फोन या लागलॅ. तिगाळा बॅहता खोटी किशासॉ मोबाइल कार्डॉन चेक करॅशी पद्दतुस नोती. मोबाइल कार्डॉन बगॅसा का? बॅलेन्स बगॅसॉ, हरपाओ गेम खॅळॅसॉ आन गानॅ आयकॅशॅ. बेमट्यानानाऑ मोबाइलवाळॅना बगॉन जाम संताप हॉअॅसॉ. दोनेक फुले भरॉन हांगॅसॉ 'मायजई याई, अॅ फालतू शोक हाडलॅत कडशॅ? वडला बॉलना हाय. खुराप जीरवॅसॉ भयनॅ आन पैसॉ जीरवॅसॉ मुस्सुमानानॅ, कुपारॅअॅ कामे नात.'

काळ पालट्या टाइम लागॅ नाय, जिओ आलास गा आन बेमाट्यानॅ पण एक वनदेवी हिंगा डबीऑडॉ नोकीया हाडलॉ. पुडॅ पोरीआ लगीन जाला, दिडेक वहरान ती हनपाळन्याइ यॅऑन गेली. लूजी शीत दिहाला तीनदा उडॅसा, मंग बेमट्या लूजीनॅ बेमट्याइ पाठ कार्डॉन एक स्मार्टफोन आपवीलॉ. हाकोट-हांज विडिओ कॉल करॅशी आण नाताई खीत मॉडॅशी आहा सल्लोता.

आतॅ स्मार्टफोन हांगीला मंजॅ कोलूतुस नाय गा? बेमट्यानानाला अस्तॅ अस्तॅ तॅव ऊनगड लागात गॅलॉ आन तोक्ते वायदळापरी बेमट्या नावाशा तुफानानॅ खेव घायलॉ.

बेमट्यानॅ लूजीला ३२ वहरात कतॅ गुड मॉर्निंग कॅला नाय पण आतॅ हाकोटे ५.३० शा मिसा आदी २-४ ग्रुपवर बेमट्यादरनॅ कय गुलाबे, कय तळ्यात पॉवनारॅ बदक, फुलाय गुच्छॅ, कतॅ इंग्लिश तॅ कतॅ हिन्दी मराठी अहॅ गुड मॉर्निंगशॅ फुटू या लागलॅ आन येतॅ हात. अनुबव वाडात गॅलॉ आन बेमट्याला बांदयादो  भयशे मुस्के हाडयाशे जाले.

शारसॉगात कय विशय कार्डॅ बास तव बेमट्यानॅ तॉंड हालविलास पाय. कय मईत नाय आहा नायुस. थॉड्यादिहान गावशे पोरे बी तॅला सानॅआ झाडोर सड्व्यादो बॉलॅशे, ‘नानो... तू उश्शार कॉडॉ रॅ?’ त्योर बेमट्या बॉलॅ ‘अरॅ, बाबा मेल्योर मंबय मा जीवोर पडली मनून नायतॅ शाळीआ रॅकाड मोडलॉसॉ तिगाळा मॅ.’

बेमट्याआ करियरशे जकले सोप्ने स्मार्टफोननॅ पुरे करॅआ घेटलॅत पन आतॅ.

युट्युबवर रिल्स आन वोट्सअपवर मेसेज विडिओ बगॉन तॉ कतॅ आयुर्वेदिक डॉक्टर हॉतॅ, कतॅ पुरातत्त्व शास्त्रज्ञ हॉतॅ आन कतॅ तॅआ होडक्या पॉलिटिक्सपासून पोपपर्यन्त फिरॉन येतॅ

एकदा ऑहॉस बेमट्यानॅ पॉट आतव्यासॉ उपाय बगीलॉ, पटलॉ आन हाकोटे उठताखोटी उदऱ्या तॉंडाय लिंबूपानी प्या सालु कॅला. एकदा आमॅ सेंटरवर कॅरम खॅळ्या बेहेलते. आमशा

टॉनीदादाआॅ पॉर मंजॅ ॲका शरीरात दोन गव. आठवीत असताना पन ८० किल्यावर हॉतॉ हायदॅ. तॅला बेमट्यानानानॅ लिंबूपान्यावगैरे डोस पाज्या सालु कॅला. टॉनीआस पॉर ता..! पटकान बोयला, ‘नानो, तुला जकल्या दुनियाचं माइती आहेपन तुझ्या एवढ्या मोठ्या भुंडळ्या गेल्याय त्याचं ओखांद नाही सापड्लं का..? टेलरदरी ने, तुजे पाय शिवून देईल बग.’ हावॅसा कॉडा....! वॅळभर आमॅ ऑडॅ हावलॅ गा बेमट्या मांदरीगथ मुक्काय निंगालॉ.

ई आहा आपीपारी कय ना कय सालुस हॉता. पन बेमट्याला युट्यूबवर जेजूस मावली ओडीस शरदा होती. कडसा कय बगीला बास, गा याला जही गावभर कळव्या जाशी उतळी. वर बी हांगातॅ, ‘आरॅ युटुपवर दिलॅ गा. वाट्सतॅप वर आलॅ गा.’

कादरखान आन आसरानी यॅनॅ तीन तीनदा मारलॅ. हां, आतॅ कालपरवा धर्मेन्द्र दोनदा मारलॉ. तॅत तॅई कय सुकी नाय. तॅ ऑहॉ बेमट्या. पन बेमट्याइ लूजी बी कय कमी नाय. तॅ जाला आहा गा लूजीनॅ युट्यूबवर रेशिपी बगिली – पनीर भुरजी. आन बेमट्या नाक्योर डेरीत धाडलॉ पाव किलो पनीर हाडया. बेमट्याला पनीर सब्द कय आठवालॉ नाय.

तॅला लूजीनॅ रेशीपित कीसलॅला पनीर दावडलोता ता आठवाला. सादारन ताहास दिखातॅ मनून तॅनॅ पाव किलो मावॉ हाडलॉ. लूजी त्योरनॅ, ‘आई..! पनीर खवॉन हाडलाक्का. काम बरा कॅला हा.’ भुरजी करता करता मावॉ विताळलॉ. लूजी बॉलातॅ, ‘अय आयकात्या ? तुमाला पनीर फसवॉन दिला हां. सरबी गथ वितळातॅ बास ता.’ लूजीनॅ बी धाना आदी मीठा खाऑन फादरला डबॉ धाडॅसॉ वायदॉ कॅलतॉ. मंग का करता, तहेबाय ताते फोडले त्यातुस आन देवळा डबॉ रवानी कॅलॉ.

दुहरॅ दि फादर, लूजीन् बेमट्या तीगे नंबर काडॉन ईंदिशान घ्यादो. फादर हांगातॅ, ‘बेमट्याची बातमी आन लूजीची भुर्जी यांचा काही भरवसा नाही.’

तॅ मंडळी, एआय आन फेक बातम्याआ जमान्यात आपली गत बेमट्या-लूजी गथीन नाय जाली पा मनून सुबेच्छा..!

# देवळाशी हप्पथ - सुजाता तुस्कानो, नंदाखाल

आज मॅ हाकोटेस विसार कॅलतॉ गा कयतरी करनॅ पन एकदोन वयस्कर खाट्यात पडलेल्या माहनांना भेट देनॅ... आन मंग विसार कॅलॉ, कुहना टाईम निवडॉ बरा ? कारन हाकोटे हाकोटे जासा मिनजॅ त्यांये आंघोळी-पांगोळीआ टाईम आहातॅ, दोपारा जासा तर जराक विहांबॉ घ्यासा टाईम, हांसा जासा तर मा टाईम जमॅ नाय. शेवटी मॅस ठरविला साडेदा-अकराआ टाईम बरबर हाय.

मॅ निंगाली... पयला खादो कय न्यासास नाय आहा मॅ ठरवॅनूस ठविलता, कारन मॅ कय नेनॅ खरी, पन डोकरे माहने, सगळास सगळ्यांना सले नाय. कुनाला हाकर तॅ कुनाला मिठा सलॅ नाय. तर कुनाला तॅलकाट बरा नाय, तॅ कुनाला तिखाट बरा नाय, मग आदी पयला बगॉ, मंग नंतर परत जावॉन त्याआ आवडीआ दिलेला कतॅही बरा.

मॅ पायरी सडली पान ओट्योर कुनूस नाय, मॅ दोन-तीन हाखो मारीत दरवाजॉ लोटीलॉ. दरवाजॉ उघडॉस हॉथॉ. घरात जानता माहनू कुनुस नॉता. दोन डोकरे माहने होते फक्त.

“कुन हाई रॅ बाबा..”

“दादय मॅ सुजा”

“आय... बाय पोरे... ये तू आलीआ, बाय तू कही हा”

“मॅ बरी हाय तुमॅ कहे हा.”

“आमॅ, मरो ना... का कऱ्यासा आतॅ कय सलात जायेगा... मरान कतॅ यॅ तिगाळा जायॅ, पण दॅवाला हांगातॅ पयला याला नॅ गा, आन मंग माला.”

दादय बॉलातोती पण मा आंगाला कापरी करतोती. “पोरे, एकदा वय जाला गा माहनू जीवाला कंटाळातॅ, सगळा नाका नाका वाटातॅ. कदो रॅसा, का खाये, मुक्काळॅ देवळा दारा जावॉन खाश्यात निजला गा बरा”

माला ई सगळा आयकताना खुप जड जातोता, पान का बॉलॉ, सगळा खरास तर हॉता.

“दादय, दादा आन वयनी कडे हाय?”

“बाय पोरे, त्या काम हाय ते मुंबय गेल्यात.”

“बाबा कहॉ हाय?”

“बाय, ओडे दि बेसकास्सॉ हॉतॉ पन दोनदी मिन्येस काकुळविलता.”

“बापरे कय?”

“आला बाय पूता, आतॅ हळुहळु त्रास वाड्यासॉस, आतॅ वय पान जाला गनॅ बाबासा.” मॅ बगीला, बाबा एका कड्या वळालॅ आन निजले. दादय हाथात लूजार घॅवॉन तेस करतॅ. मॅ दादयला विसारला, “दादय, बाबाआ खोलीत ओडी साफसपाई कुन करतॅ. दादय बोयली, “बाय, मॅ करतॅ. थोडा थोडा काम केला ते का होते ? माहनू झिजातॅ गा.” मॅ बगीला, खोली एकदम चकाचक साफ होथी, भॉठ्या भारी दवाखान्याला पान लाजविदॅ अही. केळे खराब जाले पा नात भगून खुटीला वर बांधील्यात. टॉवेल, टेबाल, भांडे सगळे चकाचक.

“दादय बाबाई आंघोळ कही करता ?”

“मॅ बाबाला तुकीतॅ. त्याला पक्षाघात जालॅ ना तॅ एक बाजू नबळी हाय तॅ ताहास तुकॉन नेतॅ, सगळे कपडे काडॉन टॉवेल गुंडाळलॉ गा बरा पडातॅ, मस्त वासाऑ हाबू लावीतॅ, मंग त्यावर पावडर सोळतॅ, गा साप-सूप हॉतॅ. त्यादिहा का जाला मायती हाया ? फादर आलतॉ कोमीनॉ द्यादो, तवूस मॅ बाबाला धवीलता आन पावडरूतन लावीलतॉ. बाबाला नवा गंजीफराक घायलोता. फादर बोयलो, आज बाबा सोबतात केवडे. मॅ हाकोटेस बाबासा दाडी-माथा कॅलता. तॅ बाबा सॉबातॉतॉ तॉहॉस, बाय.”

“मिनजॅ, तू दाडी करता ?”

“बाय, सात वहरे जाले मॅ दाडी माथा रॉज करतॅ. बघू, दाडी माथा कॅला गा कहॉ सापसुप दिखातॅ तॉ. लोक येत्यात तॅ पान हांगात्यात तुमशा खोलीत कुन शिक माहनू हाय आहा कुन हांग्यासा नाय. पान बाय त्यादिहा का जाला मयती हाय गा ? बाबा आख्खी रात निजलोस नाय फक्त लघवी जाग्यापा एका हाथायॅ खाजवितॉतॉ. मॅ बगीला, का जालॅ हायदॅ बरा ? बाय, आतॅ कुनाला हांगॉ ? पोरापारांना ई हांग्यासा तॅ ते डॉक्टरला फोन करद्यात आन डॉक्टरनॅ बी का करॅ ? ॲडमीट कऱ्या लावीदॅ.

मॅ हिम्मत केली, बाबाये सगळे कपडे काढले. बाय, तुला हांगॉ त्या लगवी जाग्यापा सगळे केहे वाडलोते, आन ते त्याला सावितोते. सगळॅ फोड फोड आलतॅ. तडे खाजवॉन तांबडा जालता. मॅ का केला मंग, त्याला बाथरूममीनॅ निला, खुरशीवर बेहविला आन नवीन बिलेट घॅवॉन सगळे केहे काडले, लान्या पोराघतीन तडे पुहीला आन घामोळ्याऑ पावडर लावीलॉ. बाय, आन तुला हांगॉ, बाबा जॉ निजलॉ तॉ दोन-तीन तास उठलॉस नाय. जिवाला सुख मिळाला. आते मॅ दर तीन मयन्याला सगळा साफ करतॅ.

एका वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्यांना लाजवीदॅ आहा काम दादय करतॅ ? बापरे.. मॅ सगळा आयकातोती. तॉंडात शब्द फुटात नॉतॉ. एक परिचारिका मनूनपन आहा काम कऱ्यादो खुप कष्ट लागात्यात व हिम्मत पन. “पोरी, बाबा माला एक मिनिट बाजूला जावॉन दे नाय. नायतॅ भोठ्याभोठ्यान तॉ अराळ्यो मारतॅ. ‘इजमाल... इजमाल... आला कडेला गेली.’ आला पोरी, आजुबाजूशॅ लोक आयकात्यात तॅ माला बरा वाटे नाय पन का करॉ... पान बाय, ती पोरी ऑबाय कामोर गेले भाजी करॉन ठविले, तॅ मॅ जरासा धान वाळतॅ गा नाय.. पान तव याऑ जीव साललॉ.”

दादय पुढे बोयली, “बाबाला मॅ हांगीलॅ तू पयलॉ जाय.. कारन तू मांगॅ रॅलॉ तॅ तुये जीवाशॅ हाल हॉयद्यात आन गॅलॉ गा माला तडे लगेस बॉलावना धाड, मॅ बी अडे रॅवॉन का करॉ.. बाबा माला हांगातॅ, मॅ वरती गॅलॉ गा तूला जॉरायॅ जॉरायॅ हाको मारनॅ गा तू पटकान ये. वेळ लावॉ नाका. माला तू पाय तडे. तू शिवाय माई सॅवा कुन करनार नाय तडे...”

मायॅ डॉळॅ पान्यायॅ भरलॅ. संवाद आयकताना आंगाला कापरी आलती. मॅ बगीला पान दादय शांत आपली बाजू मला समजावितोती. ती ऑडा करॉन जराशीपन कुरकुर करीत नोती. कॉडा प्रेम हॉता त्या दोघांत.”

“बाय पोरे, तू मा पॉटश्या गॉळ्यापरमान हा बगून हांगातॅ, देवळात लगीन करॉन हप्पथ घेटलोती ना, मंगू आतॅ नाय बॉलॉन काहा सलदॅ.”

तब्बल ‘६० तॅ ६५ वहरे’ संसार करतोते ते दोगे, आन आज या पोरा-नातवंडा हाताखाला आपला सोताआ रडगाना न गाता एखाद्या आदर्श कुटुंबातसुध्दा नाय बग्या मिळ्यासा आहा ‘वार्धक्य निभाविणारा’ आदर्श वैवाहिक जीवनाबद्दल देवळात दॅवासमोर घेठलेल्या शपथीपरमान तंतोतंत वागणारा ‘आदर्श कुटुंब’, आज वयाशा ८०-८५ वहरातसुध्दा...

“पोरे, मॅ तुला मास सगळा रामायन हांगीला पान का दॅवॉ तुला पूता.”

“दादय, मला कय नाका, तुला अन बाबाला का आवडातॅ ता हांग मॅ हाडनॅ.” नाय नाय बॉलता तिनॅ खुंटीला टांगविलॅला फन्यासा एक कॅळा काढॉन मा हाथात टेकविला.

“पोरे ये परत लवकर” “बगीते, खुब खुब आबारी.” मॅ डोळे टिपीत निघाली. मा डॉळ्यासमोर चित्र उबा रॅला, नंदाखाल चर्चमीनॅ लगीन लागताना तॅ फादरनॅ वदविलॅलॅ शब्द... “जॉन, मी तुम्हाला माझा पती म्हणून स्वीकारते, सुखदुःखात, आजारात मी तुमच्याशी एकनिष्ठ राहण्याचे वचन देते.”

(श्रीमती सुजाता तुस्कानो राष्ट्रीय फ्लॉरेंन्स नाईटिंगेल पुरस्कार सन्मानित, निवृत्त परिचारिका, समुपदेशक. महाराष्ट्र-शासन.)

## बाहांलॉ – विजु वाझ, दारसेंग

घरनॅ निंगालॉ, अरद्या रस्त्यात पॉसलॉ आन आठोन आली..

आज मन रंजी जालता. मनाला जही रुकरुक लाग्लोती.

कामोर पॉसलॉ, कामात कय लक्ष नाय लागला..

रॉजसॉ येतॅ तहॉ बायकूऑ फोन आलॉ, मॅ जक्ला हावात खॅळात हांगीला.

जीवलॉ. भाजी मस्त जालती आहा खॉटा बोयलॉ. पन माऑ डबॉ आज तॉहॉस हॉतॉ.

विसार कॅलॉ, आंहा का जालॅ? का बाहांलॅ?

दी भरलॉ. हांसॉ घारा पॉसलॉ, दादी बोयली, “पॉरा! हाकोटे कनेरी न पेता गॅलॉ तॉ...?

आन माई टुप पेटली. डबॉ माई बायकू करतॅ पन कनेरी.. ती माई दादी करतॅ.

आन ती पॅऑन घर होडताना, ‘दादे, मॅ आलॉ हां..

इ बोल्ना बॉल्या आज बाहांलॉ. आख्खो दी मन कदो रंजी जालता ता हांश्यापारा हुमजाला.

मॅ बाहांल्याबनॅ माआ दादीआ मनात आख्ख्या दिहात कॉडॅ सतरा-पंद्रा विसार आलॅ हायद्यात..

माऑ पूत आज कनेरी न पेता न बॉलता गॅलॉ कामोर... माआ का सुकलॅ हायदॅ ?

‘जेजूस मावले माला माफ कर. माआ पॉराला बरा आयूश्य दे.’

दादीनॅ मावली दरी मा करता विनवनी केली.

मॅ फोनवर बायकूआ हरी बोयलॉ, पन दादीआ हरी नाय..

इस बाहांलॉ, दादीला “आलॉ” बोयलॉ नाय.

पॉरांदो, आतॅस कडे जात्या-येत्या ता आयाबापांना बॉलॉन जा..

नंतर आपू खूप कय बॉलॅ, पन आयबाप कडे हात...?

## हिंदाळॉ माशी - आलेक्स पिटर डाबरे, निर्मळ

ओटोरश्या माशीत,
माडुंल्योर निझवॉन
लेकुराला लाईता लळॉ,
माशी गाइता गाइता ।

वाटीभरॉन दूध गायसा घॅता
गोजिरल्याला पाजीता,
आबोरश्या सांदाला बोलविता
माशीई दोरी तानता तानता ।

माय  मरीयेनॅ  वॅगॅत,
जेजू बाळाला धरल्यागत ।
निजविता तान्हुल्याला,  आई माऊली आमची
ई गीत आयकविता,  हिंदाळॉ गाइता गाइता ।

ओट्योरश्या उखळात हडॉन,  रात्याय सावूळ ।
जात्योर दळता दळता,  रमेद  मायसा गीत गाता
हेल, सूर आयकविलॅ लेकुर बाळाला,
थोपटता, निजविता तान्हुल्याला
हिंदोळ्याई दोरी तानता तानता ।

केळीआ खॉल्यात थापीलॉ पीठ,
बनविलॉ पालंगॉ
वांग्याआ कुड्यायॅ सुलीओर

खापरीत भूजीलॉ
शामिनॅ बुडवॉन लेकुराला भरविलॉ ।

शिमटॉ पॉटाला,  माय-बापानॅ घॅटलॉ
अहॅ दी काडॉन पोरांना वाडविला ।
पन्नास-साठ वहरा मागशॅ दी आठविता
डॉळॅ भरॉन येत्यात आज  ।।

गरूडा  पंखाये  तॉ ती गेले उडॉन
साता समुद्रा पार,  साता समुद्रा पार ।
वहरा भरानॅ मायबापाला बोलवितॅ
स मयन्याओ विझा घॅवॉन
PHD  आन M.D. कऱ्यादो
मंजॅ...